cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८९ | सोमवार दि.१६ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बोलू द्या, उत्तर द्या ; लोकशाहीची खरी कसोटी

राहुल गांधी यांच्या विरोधात विशेषाधिकार प्रस्ताव न आणण्याचा भाजपचा निर्णय हा केवळ संसदीय तांत्रिक बाब नाही; तो सध्याच्या राजकीय वातावरणाचा दिशादर्शक ठरू शकतो. गेल्या काही दिवसांतील घटनांनी सरकारला बचावात्मक पवित्र्यात उभे केले होते. या पार्श्वभूमीवर आक्रमक पाऊल उचलण्याऐवजी माघार घेणे हे राजकीय शहाणपणाचे लक्षण म्हणावे लागेल.

## थोडक्यात...

### केदारनाथचे द्वार २२ एप्रिलला उघडणार

डेहराडून : उत्तराखंडमधील प्रसिद्ध केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी यावर्षी २२ एप्रिल रोजी उघडले जाणार आहेत. हिवाळ्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून बंद असलेले हे मंदिर पुन्हा एकदा भक्तांच्या जयघोषाने दुमदुमणार असल्याची माहिती मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर यात्रेचा मुहूर्त निश्चित करण्यात आला. बद्रीनाथ–केदारनाथ मंदिर समितीचे जनसंपर्क अधिकारी हरीश गौर यांनी सांगितले की, भगवान केदारनाथांचे हिवाळी वास्तव्य असलेल्या ओंकारेश्वर मंदिरात हा निर्णय घेण्यात आला. हिंदू पंचांगानुसार गणना करून मंदिर उघडण्याची वेळ निश्चित केली.

### एसटी प्रवासासाठी स्मार्ट कार्ड योजना

नाशिकः सवलतधारक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटीच्या प्रवासात आता ऑनलाइन तिकीट बुकिंग सुविधेनंतर प्रवाशांसाठी शासन आता स्मार्ट कार्ड योजना राबविणार आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड प्रणाली लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (स्मार्ट कार्ड) अनिवार्य असणार आहे. नुकत्याच झालेल्या एसटी महामंडळाच्या बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही घोषणा केली.

### महात्मा फुले कृषी विद्यापीठात कृषी महोत्सव

राहुरीः राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात बुधवारी (दि. १८) फुले कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाचे उद्घाटन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. महोत्सवानिमित्त विविध पिकांचे शंभर एकर क्षेत्रावरील शेतकऱ्यांना पीक प्रात्यक्षिकांची पाहणी, शिवारफेरी, कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शेती तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली जाणार आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, कृषी विभाग, आत्मा, यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या परिसरात फुले कृषी महोत्सव– २०२६ थेट पीक प्रात्यक्षिके, शिवारफेरी व कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, कृषी आयुक्त सूरज मांढरे उपस्थित राहणार आहेत.

### बांगलादेशात शपथविधीला लोकसभाअध्यक्ष राहणार

ढाकाः बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेशच्या नवनियुक्त सरकारच्या शपथविधी सोहळ्याला भारताचे प्रतिनिधी म्हणून लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला उपस्थित राहणार आहेत. मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी ढाका येथे हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी दिली. परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ‘‘ओम बिर्ला यांचा महत्त्वाच्या सोहळ्यातील सहभाग भारत आणि बांगलादेशमधील जनतेमधील दृढ आणि चिरंतन मैत्री अधोरेखित करतो. दोन्ही देशांना जोडणाऱ्या लोकशाही मूल्यांबद्दल भारताची असलेली बांधिलकी यातून पुन्हा एकदा सिद्ध होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१३ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.०० क्विंटल | २,१५१ | ३,४५० | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड :२७.०० क्विंटल | २,३०० | ४,३५१ | ३,५०५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ९.०० क्विंटल | ७,२०१ | ७,८५० | ७,६७४ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,०५० | ३,११६ | २,७३७ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,५०० | ५,२०० | ४,७६६ |

# ...तर भारतीय कापूस उत्पादकांना फटका!

## अमेरिकेसोबतच्या व्यापारी करारावरून राहुल गांधींचा हल्लाबोल





नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारत–अमेरिका व्यापार धोरणात कापूस आणि गारमेंट्सवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी, वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्यासह कॅबिनेटवर जोरदार हल्ला चढवला आहे. अमेरिकेसोबत झालेला व्यापार करार हा कापूस उत्पादक शेतकरी आणि गारमेंट्स उद्योगाला ‘धोका’ देणारा करार केल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर भ्रम पसरवत असल्याचा हल्लाबोल केला.**

राहुल गांधी यांनी आपल्या ट्विटमध्ये बांगलादेशला अमेरिकेत गारमेंट्स निर्यातीवर ० टक्के टॅरिफचा फायदा दिला जात आहे. मात्र, त्यासाठी बांगलादेशने अमेरिकन कापूस आयात करावा, अशी अट घातली आहे. याउलट भारताच्या गारमेंट्सवर १८ टक्के टॅरिफ लागू करण्यात आला आहे. संसदेत या मुद्यावर प्रश्न उपस्थित केल्यावर सरकारच्या मंत्र्यांनी दिलेले उत्तर राहुल गांधी यांनी उघड केले. मंत्र्याचे म्हणणे होते की, जर हाच फायदा भारताला हवा असेल तर अमेरिकेकडून कापूस आयात करावी लागेल. यावर राहुल गांधी यांनी सवाल उपस्थित करत ही बाब देशापासून आतापर्यंत लपवून का ठेवली गेली, असे म्हटले. राहुल गांधी यांनी या परिस्थितीला पुढे आड आणि मागे विहीर अशी उपमा दिली. जर भारताने अमेरिकन कापूस आयात करण्याचा ▶▶ पान २ वर

> **अमेरिकेच्या दबावापुढे मोदी सरेंडर**
>
> राहुल गांधी यांनी पंतप्रधानांवर थेट निशाणा साधत नरेंद्र ‘सरेंडर’ मोदी असा टोला लगावला. त्यांच्या म्हणण्यानुसार हा करार राष्ट्रीय हिताचा नसून दबावाखाली केलेला निर्णय वाटतो, जो देशाच्या आर्थिक कणा असलेल्या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांना धोक्यात टाकणारा ठरू शकतो, असेही त्यांनी म्हटले आहे.

## राज ठाकरेंच्या भाषणांची उच्च न्यायालय करणार चौकशी

मुंबई । प्रतिनिधी



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. अमराठी भाषिकांविरोधात राज ठाकरे तसेच त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी कथितपणे केलेल्या द्वेषपूर्ण वक्तव्यांची तपासणी होणार असून न्यायालयाने कथित वक्तव्यांचा तपशील मागविला आहे.

उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी एक याचिका दाखल केली आहे. त्यांनी आपल्या अर्जात राज ठाकरे आणि संबंधित कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. शुक्ला यांनी दावा केला आहे की, त्यांच्या कार्यालयावर मनसेशी संबंधित सुमारे ३० व्यक्तींनी तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. तसेच समाजमाध्यमांवर पोस्ट करून त्यांना ▶▶ पान २ वर

## ‘विलीनीकरणा’वरून राष्ट्रवादीत मतभेद

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचे मात्र मौन

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या मुद्यावरून सध्या राजकीय हालचाली सुरू आहेत. दोन्ही बाजूंनी नेत्यांकडून सातत्याने विधाने केली जात असली तरी अंतिम निर्णयाचा अधिकार असलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अद्याप मौन बाळगले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे पक्षातील अनेक वरिष्ठ नेत्यांची धास्ती वाढली आहे.**



विलीनीकरणावर निर्णय घेण्यापूर्वी सुनेत्रा पवार लवकरच आमदारांशी ‘वन–टू–वन’ बैठक घेऊन त्यांची मते जाणून घेणार आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय आमदार हिरामन खोसकर यांनी दावा केला आहे ▶▶ पान २ वर

> **विलिनीकरणाचा विषय आता बंद – शशिकांत शिंदे**
>
> शशिकांत शिंदे यांनी स्पष्ट केले की, अजित पवार हयात असताना दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाबाबत निर्णय झाला होता. मात्र, सध्या विलीनीकरणाचा विषय पूर्णपणे बंद केला आहे. आम्हीच त्यासाठी मागे लागलो आहोत, असे चित्र चुकीचे आहे. आमच्याकडून कोणतीही घाई करण्यात आलेली नाही, असे त्यांनी ठाम वक्तव्य केले.

## मतभेद विसरून एकत्र या–धनंजय मुंडे

परळी । प्रतिनिधी



**महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी मतभेद बाजूला ठेवून बीडच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे दर्शन घेतले.**

दर्शनानंतर त्यांनी राज्यातील जनतेचे जीवन सुखी, समाधानी व समृद्ध राहावे यासाठी महादेवाकडे प्रार्थना केली. बीडच्या विकासासाठी ▶▶ पान २ वर



**परळी वै.: बारा ज्योतीरलिंगापैकी एक असलेल्या परळी येथील प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी महाशिवरात्रीनिमित्त पहाटे पाच पासून भाविकांनी रांगा लावल्या होत्या.राज्यभरातुन भाविकांनी मोठी गर्दी केली होती त्यावेळी हर हर महादेव या घोषणांनी प्रभुवैद्यनाथाचा परिसर दणाणुन गेला होता.**

## मुंबईत ‘एआय फॉर ॲग्री २०२६’ जागतिक परिषद

पुणे । प्रतिनिधी

जगात शेती आता केवळ ट्रॅक्टर आणि नांगरापुरती मर्यादित राहिलेली नसून ती आता उपग्रह (सॅटेलाईट) आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात प्रवेश करत आहे. या बदलाचे नेतृत्व करण्यासाठी राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले असून, येत्या २२ आणि २३ फेबुवारी २०२६ रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर (बीकेसी) येथे ‘एआय फॉर ॲग्रि २०२६’ या जागतिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन रविवारी (दि.२२) सकाळी साडे अकरा वाजता होणार असून यावेळी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ▶▶ पान २ वर

## केजच्या तरूणाचा येरमाळा तालुक्यात खून

### सोबतच्या मित्रांनीच काटा काढल्याचा कुटुंबियांचा आरोप, पाचजण ताब्यात

बीड । प्रतिनिधी



धाराशिव जिल्ह्यातील कलाकेंद्राचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून महाकाली कला केंद्रावर तमाशा पहायला गेलेल्या केज तालुक्यातील एका तरुणाचा त्याच्याच मित्रांनी खून केल्याची घटना उघडकीस आली आहे, या प्रकरणी येरमाळा पोलिस ठाण्यात पाच जणाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मयताचे वडील भागवत मुंडे यांनी तक्रार दिली आहे.

केज तालुक्यातील साळेगाव येथील ३७ वर्षीय सतीश मुंडे असे मयत तरुणाचे नाव आहे. घटनेच्या दिवशी तो आपल्या काही मित्रांसह धाराशिव जिल्ह्यातील चोराखळीच्या महाकाली कला केंद्रावर संगीतबारी पाहण्यासाठी ▶▶ पान २ वर

## पंतप्रधान मोदींकडून महाराष्ट्रासह चार राज्यांना रेल्वे प्रकल्पांची भेट; १८,५०९ कोटींच्या खर्चाला मंजुरी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या तीन महत्त्वाच्या बहुमार्गी प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणा आणि कर्नाटक या चार राज्यांतील १२ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे जाळे विस्तारणार असून, एकूण ३८९ किलोमीटरची भर पडणार आहे. १८,५०९ कोटी रुपये अंदाजे खर्च असलेले हे प्रकल्प २०३०–३१ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ▶▶ पान २ वर



# जनतेचे आरोग्य खेळ वाटला का?

## पॅकेज्ड फूडवर इशारा खूण का नाही; सर्वोच्च न्यायालयाने फटकारले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

बाजारात विक्री होणाऱ्या पाकीटबंद (बिस्किटे, चिप्स, शीतपेये इ.) पदार्थांमध्ये असणाऱ्या साखर, मीठ आणि चरबीच्या घातक प्रमाणाबद्दल पाकिटावर स्पष्ट इशारा असावा, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. याप्रकरणी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने दिलेल्या उत्तरावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

३ एस आणि अवर हेल्थ सोसायटी या संस्थेने एक जनहित याचिका दाखल केली आहे. पॅकेज्ड फूडच्या पाकिटावर साखर, मीठ आणि चरबी यांचे प्रमाण किती आहे, याचा स्पष्ट इशारा समोरच्या बाजूला असायला हवी, अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. हे नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या माहितीच्या अधिकारासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे. यावर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, पॅकेज्ड फूडच्या पाकिटावर आम्ही स्टार रेटिंग देण्याचा विचार करत होतो, पण त्यावर कंपन्यांचे एकमत नाही. आम्ही पोषणमूल्यांची माहिती ठळक अक्षरात छापण्याचे प्रस्तावित केले होते, पण ती बैठक पुढे ढकलण्यात आली. आम्हाला अजून ▶▶ पान २ वर




## पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळता ते चालते का?

नाशिक । प्रतिनिधी

आम्हाला शिवाजी महाराज आदरणीय आहेत, पण त्याचसोबत टिपू सुलतान यांचे कार्यही विसरता येणार नाही. इंग्रजांविरोधात लढणारे टिपू सुलतान देशद्रोही होते का? असा प्रश्न मालेगावातील इस्लाम पार्टीचे प्रमुख आणि माजी आमदार आसिफ शेख यांनी विचारला. टिपू सुलतान फक्त वेगळ्या धर्माचे आहेत म्हणून भारतीय जनता पक्षाकडून त्यांना विरोध केला जात आहे. मग भारतावर दहशतवादी हल्ले करणाऱ्या पाकिस्तानसोबत क्रिकेट का खेळले जातेय असा प्रश्नही त्यांनी विचारला. इंग्रजांविरोधात देशासाठी लढताना बलिदान देणाऱ्या टिपू सुलतान यांचा जर फोटो लावला तर त्यामध्ये गैर काय आहे असेही आसिफ शेख यांनी विचारले आहे.

मालेगावातील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतानचा फोटो लावण्यात आला होता. भाजप आणि हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध केल्यानंतर तो काढण्यात आला. त्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासोबत केली. त्यावर आता मोठा वाद निर्माण ▶▶ पान २ वर

cmyk

cmyk



अग्रलेख

# बोलू द्या, उत्तर द्या ; लोकशाहीची खरी कसोटी

राहुल गांधी यांच्या विरोधात विशेषाधिकार प्रस्ताव न आणण्याचा भाजपचा निर्णय हा केवळ संसदीय तांत्रिक बाब नाही; तो सध्याच्या राजकीय वातावरणाचा दिशादर्शक ठरू शकतो. गेल्या काही दिवसांतील घटनांनी सरकारला बचावात्मक पवित्र्यात उभे केले होते. या पार्श्वभूमीवर आक्रमक पाऊल उचलण्याऐवजी माघार घेणे हे राजकीय शहाणपणाचे लक्षण म्हणावे लागेल.

प्रसंगाची सुरुवात झाली ती निवृत्त लष्करप्रमुख नरवणे यांच्या पुस्तकातील कथित उल्लेखावरून. गलवान संघर्षाच्या संदर्भात निर्णयप्रक्रियेबाबत काही निरीक्षणे पुस्तकात असल्याचा दावा करण्यात आला. सरकारने ''पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही'' या कारणावरून चर्चा रोखण्याचा प्रयत्न केला. कायदेशीर दृष्ट्या ती भूमिका ग्राह्य धरता येईल; पण राजकारणात केवळ तांत्रिक बाजू पुरेशी ठरत नाही. चर्चा रोखल्यामुळेच विषयाला अधिक प्रसिद्धी मिळाली आणि विरोधकांना आक्रमक होण्याची संधी मिळाली.

गलवानसारख्या संवेदनशील विषयावर सरकार अधिक ठाम आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेऊ शकले असते. ''लष्कराला कारवाईपासून रोखले नाही'' किंवा ''निर्णयात विलंब हा परिस्थितीजन्य होता'' अशी स्पष्ट मांडणी करून वादाचा फुगा तेव्हाच फोडता आला असता. उलट, बचावात्मक सूर आणि विरोधकांना बोलू न देण्याचा प्रयत्न यामुळे संशयाची छाया अधिक गडद झाली.

यानंतर संसदेत भूराजकीय समीकरणे, अमेरिकेसोबतचा व्यापार करार आणि इतर मुद्द्यांवरूनही सरकारला कोपऱ्यात ढकलण्याचा प्रयत्न झाला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी विशेषाधिकार प्रस्तावाचे संकेत दिले; परंतु त्यातूनच नव्या वादळाला आमंत्रण मिळू शकले असते. कारण विशेषाधिकार प्रस्ताव म्हणजे केवळ एका वाक्यावर कारवाई नव्हेतर त्या सर्व संदर्भांची सखोल चर्चा उघडण्याची तयारी. नरवणे यांच्या पुस्तकापासून ते परराष्ट्र आणि व्यापार धोरणांपर्यंत अनेक मुद्दे एकाच वेळी चर्चेच्या केंद्रस्थानी आले असते.

अमेरिकेचे अध्यक्ष यांच्या घोषणेनंतर व्यापार कराराबाबत निर्माण झालेला संभ्रम अजूनही पूर्णपणे निवळलेला नाही. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांना वारंवार स्पष्टीकरण द्यावे लागत आहे. शेतकरी संघटनांमध्येही अस्वस्थता आहे. राकेश टीकैत यांसारख्या नेत्यांनी आंदोलनाची तयारी दर्शवली आहे. अशा परिस्थितीत संसदीय संघर्ष अधिक तीव्र झाला असता, तर त्याचा राजकीय फटका सत्ताधाऱ्यांनाच बसण्याची शक्यता अधिक होती.

यातून एक मूलभूत प्रश्न उभा राहतो, लोकशाहीत विरोधकांना कितपत आणि कसे उत्तर द्यायचे? मतभेदांना दाबून ठेवण्याचा प्रयत्न तात्पुरता दिलासा देऊ शकतो; पण दीर्घकालीन राजकीय विश्वासाला तडा देतो. संसद ही चर्चा आणि उत्तरदायित्वाची जागा आहे. विरोधक आक्रमक असतील, टीका करतीलहे स्वाभाविकच. त्यावर ठोस, तथ्याधारित प्रत्युत्तर देणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे.

विशेषाधिकार प्रस्ताव न आणण्याचा निर्णय म्हणजे पराभव नव्हे; तो संभाव्य राजकीय आत्मघात टाळण्याचा प्रयत्न आहे. परंतु केवळ माघार पुरेशी नाही. सरकारने आता स्पष्ट, सुसंगत आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका मांडली पाहिजे. शंका आणि संभ्रम यांना वाव न देता पारदर्शकतेने संवाद साधला, तरच विश्वास दृढ होईल. शेवटी, कोणाचे म्हणणे जनतेला पटते हे मतपेटीत ठरते. लोकशाहीत कसोटी हीच बोलू द्या, आणि ठामपणे उत्तर द्या. विरोधकांना गप्प बसवण्यापेक्षा त्यांना उत्तर देणे अधिक परिणामकारक असते. सरकारने घेतलेली ही माघार जर व्यापक संवादाच्या दिशेने पहिले पाऊल ठरली, तर ती लोकशाहीसाठी सकारात्मक ठरेल.

## भवानवाडी येथील भवानीगडाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणार–आ.विजयसिंह पंडित

**बीड । प्रतिनिधी**

**अखंडानंदगिरी महाराज भवानीगडकर यांनी गेल्या काही वर्षापासून महाशिवरात्री निमित्त सामूहिक दिव्य शिवपूजन सोहळा व एक दिवसीय कीर्तन महोत्सव भवानी गडावर सुरू केलेला आहे. हा गड तरुण पिढीसाठी आदर्श असा आहे. या ठिकाणी तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी व गडाच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनित्राताविहिनी पवार यांच्या माध्यमातून या ठिकाणी विकास निधी उपलब्ध करून देऊअसे प्रतिपादन आ.विजयसिंह पंडित यांनी केले आहे.भवानवाडी येथील भवानीगडावर झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.**

बीड तालुक्यातील भवानवाडी येथील भवानीगड येथे महाशिवरात्री निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना आ. विजयसिंह पंडित पुढे बोलताना ते म्हणाले की, अखंडानंदागिरी महाराज भवानीगड यांच्या माध्यमातून त्या ठिकाणी सांप्रदायिक प्रशिक्षण दिले जाते.तरुण पिढीसाठी वारकरी संप्रदाय काळाची गरज आहे.आजकाल तरुण पिढीही मोबाईल मध्ये गुरुफटलेली दिसत आहे.त्या मोबाईलचा वापर चांगला होत नसून तरुण पिढी अधोगतीकडे चाललेली असताना, त्या वळणावर अखंडानंदागिरीजी महाराजांनी



तरुणांना व्यसनाधीनते पासून मुक्त करून संप्रदायाकडे वळवले आहे. ही अतिशय चांगली बाब असून त्यासाठी जे काही सहकार्य होईल ते मी करण्याचा प्रयत्न करणार असुन येणाऱ्या काळात या भवानीगडच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्न करणार आहोत असेही ते यावेळी बोलताना म्हणाले. या कार्यक्रमात उपस्थित राहिल्या बद्दल जरुड, शिवणी, भवानवाडी, मौजवाडी येथील सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकऱ्यांच्या वतीने, आ.विजयसिंह पंडीत यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी महंत अखंडानंदगिरी महाराज भवानीगडकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, घोडका राजुरीचे सरपंच सचिन घोडके, जरूड गावचे सरपंच श्रीराम काकडे, भवानवाडीचे सरपंच गणेश जगताप, मौजवाडीचे सरपंच तेजाब चव्हाण, शिवनीचे सरपंच विजय सुपेकर, उपसरपंच सुधाकर डोळस, महादेव सानप, बबन डोळस, उपसरपंच पंजाब काकडे, जालिंदर काकडे, राजेंद्र गुरुजी, श्रीराम पाटील, राधाकिसन बापू, ईश्वर काकडे, बबनराव काकडे, श्रीराम जगताप, संजय मोटे, राम जगताप, आप्पासाहेब जाधव, मोहन भोसले, महादेव जगताप, अंबादास जगताप, दगडू शिंदे, दगडू मुंडे, रघुनाथ मुंडे, नवनाथ जगताप, अमोल येवले, उद्योजक आप्पासाहेब डावकर, माणिकराव डावकर, रवीबप्पा डावकर, इंजि.तेजस डावकर यांच्यासह सर्व कार्यकर्ते, पंचक्रोशीतील भावीकभक्त, महिला भगिनी, तरुणवर्ग, प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

## सुपारी देवुन मोसंबी व्यापारी व मुलास मारहाण करुन लुटणारी टोळी पकडली २ लाख ४३ हजारचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरालगत असलेल्या मांडवा शिवारात एका व्यापाऱ्यास मोसंबीचा बाग दाखवीण्यासाठी बोलावुन व्यापारी व त्याच्या मुलास गंभीर मारहाण करुन त्यांचेकडे असलेले रोख रक्कम, सोन्याची अंगठी य व्यापाऱ्याचा मोबाईल जबरीने हिसकावून लुटुन नेल्याची घटना घडली होती. त्यावरुन पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुन्हा दाखल झाला होता. गुन्हयाचे गांभीर्य पाहुन पोनि बाळासाहेब पवार यांनी आरोपी शोध कामी पथक नेमुण त्यांना सुचना केल्या होत्या. व्यापारी पहील्यांदाच जालना भागात आलेला असल्याने व त्याची कोणाशी ओळख पाळख नसल्याने सदर गुन्हयामध्ये कोणताही सुगावा उपलब्ध होत नव्हता. परंतु चंदनझिरा पोलीस पथकाने गुन्हयाचा कौशल्यपुवर्क तसेच तांत्रीक तपास करुन गोपनीय माहीतीच्या आधारे सदर गुन्हा गणेश परळकर याने त्याचे साथीदारांसह केला असल्याचे निष्पन्न केले. त्यावरुन गणेश परळकर वय २१ वर्षे रा. गांधीचमन जालना ह. मु. सुदंरनगर चंदनझिरा यास ताब्यात घेतले व विचारपुस केली. परंतु गणेश हा पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देवून संभ्रम निर्माण करत होता. तेंव्हा त्यास पोलीसी खाक्या दाखवीताच त्याने सदरचा गुन्हा हा लाडसावंगी जि. छत्रपती संभाजीनगर येथील ईसमाकडुन सुपारी घेवुन केला असल्याचे कबुल केले व सदर गुन्हा करतांना त्याचे इंतर साथीदार सोबत असल्याचे कळवील्याने पोलीसांनी शिघ्र तपास करुन त्याचे साथीदार महेश ऊर्फ सोनु राजु गोशीक वय २४ वर्षे रा. लक्ष्मीनारायणपुरा , गणेश बाबुराव मोहीते वय ४२ वर्षे रा. जालना हॉस्पीटलच्या मागे , गणेश पाखरे वय ४३ वर्षे रा. दरेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर ,ईलीयास नजीरोहीन बागवान रा. लाडसावंगी ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांना ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

सर्व अटक आरोपींकडे तपास केला असता आरोपी इंलीयास बागवान याचा व गुन्हयातील जखमी अशफाक बागवान यांचा आपसात जुना वाद असल्याचे कारणावरुन ईलीयास बागवान याने दरेगाव येथील आरोपी गणेश पाखरे याचे मार्फतीने गणेश परळकर व त्याचे टोळीस सुपारी दिली होती. त्यानंतर सर्व आरोपींनी व्यापा-यास मोसंबीचा बाग दाखवीण्याचा बहाणा करुन एकांतस्थळी बोलवुन मारहाण करण्याचा कट शिजवला व केले कटाप्नमाणे व्यापारी व त्याचे मुलास मारहाण करुन गंभीर दुखापत केली व त्याचे कडील रोख रक्कम, सोन्याची अंगठी व मोबाईल फोन जबरीने हिसकावुन लुटुन नेला होता. सदर गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी गणेश परळकर, गणेश मोहोते यांनी त्यांचा तीसरा साथीदार कृष्णा दिपक पैंजणे याचे सोबत मिळून भर दुपारी अंबड रोडवर अशोक हॉटेल समोर एका दुचाकीस्वाररस अडवुन खंजीरने गंभीर वार करुन त्याचे कडील सुमारे साडेतीन लाख रुपये जबरीने लुटुन घेतल्याची कबुली दिल्याने अधिक माहीती घेतली असता सदर प्रकरणात तालुका पोलीस ठाणे जालना येथे गुरनं ७७६/२०२५ कलम ३०९(६), ३(५) भान्यासंप्रमाणे गुन्हा दाखल असल्याची व गुन्हा केल्यापासुन आरोपी रोख रक्कमेसह फरार असल्याची माहीती प्राप्त झाल्याने कृष्णा पैंजणे यास पोलीस ठाणे तालुका जालना यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर टोळीकडुन जिल्हयातील ईतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे पोलिसाकडून सांगण्यात आले . चंदनझिरा येथील गुन्हयात आरोपींनी गुन्हा करतांना वापरलेले मोबाईल फोन, दोन खंजीर व मोटार सायकली असा एकुण सुमारे ०२ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात एक आरोपी जित्तु मेहरा रा. मस्तगड हा फरार आहे. आरोपींना मा. न्यायालयात हजर करुन पुढील तपास करण्यात येणार आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बन्सल , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शना चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या पथकाने कारवाई केली.

## नागरिकांच्या सतर्कमुळे स्टेट बँकेवरचा दरोडा टाळला

**जालना । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यातील वडीगोद्री भारतीय स्टेट बँक शाखेत शनिवारी ता.१४ रोजी मध्यरात्री चोरट्यांनी बँक फोडण्याचा प्रयत्न केला परंतु नागरिकांच्या सतर्कमुळे दरोडा टाळला मात्र या मध्ये सर्व रोकड, ऐवज ,सुरक्षित असल्याने खाते धारकांचा जीवात जिव आला आहे रविवार ता.१५ रोजी सकाळी हि घटना उघडकीस आली.**



या ठिकाणी बँक शेजारी असलेले शेतात कटर,सिलेंडर, बैग, असे चोरीचे साहित्य आढळले, सदरील ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज मध्ये पाच संशयित चोरटे दिसत आहे, सीसीटीव्ही रुमालाने चोरांनी झाकुन टाकले होते, सीसीटीव्ही कॅमेराला काळा रंग लावण्यात आला होता. या ठिकाणी गावात राखणदार करणारे गुराखा व नागरिक सतर्क राहिल्याने मोठा अनर्थ टळला आहे तसेच गोदी पोलिस यांचे रात्री गस्त या दरम्यान होते सदर घटनेची माहिती मिळताच गोंदी पोलीस ठाण्याचं पथक व बँक शाखा व्यवस्थापक श्री रोहित कालगे ,कर्मचारी दाखल झाले जालना येथुन मोबाईल फॉरेन्सिक पथक, स्वान पथक दाखल झाले स्वान पथकांनी भागात तपास केला चोरांच्या जवळील बगेत चोरीचे साहित्य आढळून आले बँकेच्या अधिकारी, पोलीस कर्मचारी यांनी बँकेत पुर्ण तपासणी करूण मुद्देमाल, सोन्याचे ऐवज सुरक्षित असल्याचे सांगितले.

याप्रकरणी वडिगोद्री येथे बँकेचा मागचा दरवाजा तोडुन चोरट्यांनी बँक फोडण्याचा प्रयत्न केला या ठिकाणी पाहणी केली असता बँक मधिल सर्व ऐवज,रक्कम, दस्त ऐवज सुरक्षित आहे चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तीन पथक तैनात करण्यात आली आहे. बँकेत सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याबात बँकेच्या वरिष्ठ अधिकारी यांच्या सोबत चर्चा केली आहे . शनिवारी मध्यरात्री चोरट्यांनी बँक फोडण्याचा प्रयत्न केला चोर बँकेत गेल्यावर त्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला या मध्ये बँकेतील सर्व दस्त ऐवज, रक्कम, मुद्देमाल, सुरक्षित आहे यात कोणतेही नुकसान झाले नाही सर्व खाते धारकांचे सोने,पैसा, सुरक्षित आहे खाते धारकांनी काळजी करू नये दिवसा सुरक्षा रक्षक असतो आता रात्र पाळीमध्ये सुध्दा सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार आहे.

# बोर्डाची परीक्षा,जाच कुणाला ?

## परीक्षा मुलांची आहे, आई–वडीलांची नाही; हे पालक विसरतात आणि घरात ताण वाढतो– डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

दहावीची बोर्डाची सुरु आहेत बारावीची सुरुच आहे. विविध प्रवेश परीक्षांचे वार्षिक परीक्षांचेही आता अगदी मोजके दिवस हातात राहिलेले असताना, अगदी शेवटी नेमकं काय करावं, हा यक्षप्रश्न मुलांनाही पडतो आणि त्यांच्या पालकांनाही छळतो. खरं सांगायचं तर परीक्षेचा अभ्यास ही सतत नियमाने करायची आहे तब्येत राहावी, म्हणून रोज व्यायाम करायला हवा अगदी तसंच!

एका दिवसात किंवा आठवड्यात तुम्ही मॅरेथॉन धावू शकत नाही किंवा कोणत्याही खेळाच्या स्पर्धेत भाग घेऊ शक नाही, तर त्यासाठी नियमितपणे बराच काळ प्रयत्न करायचे असतात. तसेच,तुमचाही अभ्यास वर्षभर नियमित झाला आहे, असे मसजून आता शेवटच्या काही दिवसांत मुलांना आणि त्यांच्या आई–वडिलांनाही उपयोगी पडणाऱ्या गोष्टी बघूयात... सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आपला परीक्षेकडे बघण्याचा निकोप दृष्टिकोन, परीक्षा माझ्या आयुष्यात आलेला अडथळा/समस्या किंवा परीक्षेतील मार्क म्हणजे उत्तम आयुष्याची हमी,या दोन्ही विचारसरणींमुळे अनावश्यक ताण निर्माण होतो. मग अभ्यास केलेला असूनही परीक्षेत ब्लॅक होणं, खूप घाबरणं, आजारी पडणं,अशी लक्षणं दिसू लागतात. परीक्षा म्हणजे आपल्याला किती समजलंय आणि कशाचा अभ्यास किंवा सराव अजून करायला हवाय, एवढंच आपल्याला सांगणारी घटना आहे. परीक्षेतील मार्कांचा आणि आयुष्यातील आनंदाचा/यशाचा कोणताही सरळ संबंध नसतो.परंतु आपल्या देशातील शिक्षणपध्दतीमध्ये मार्कांवर करिअरची बरीचशी दिशा अवलंबून असते, त्यामुळे परीक्षेकडे वास्तववादी दृष्टिकोनातून बघणे खूप गरजेचे आहे. परीक्षेकडे संपूर्ण दुर्लक्ष किंवा परीक्षेचे अवडंबर करणे या दोन्ही गोष्टी टाळायला हव्यात. आपल्या पूर्वी झालेल्या चुकांचा विचार करत बसणे, त्याचा



अतिविचार करणे/भिती बाळगणे. विषयाची अतिचिंता करणे, अँडमिशनचा,कट ऑफचा विचार करणे, वर्षभरात जो भाग अभ्यासला नाही, त्याचा अचानक अभ्यास करणे, इतरांशी खूप चर्चा करणे, मित्रमंडळींशी वायफळ गप्पा/ गॉसिप करणे, ग्रुपस्टडी करु नये.,वैयक्तिक अभ्यास अधिक उपयोगी पेपर लिहिताना मार्कांचा अंदाज घ्यायची घाई अजिबात नको., प्रत्येकाचे बायोक्लॉक/जैविक घड्याळ निरनिराळे असते. आदर्श टाईमटेबलच्या मागे लागून स्वतःला न जमणाऱ्या गोष्टी करु नये. जागरण किंवा खूप लवकर न उठताही दिवसभरात योग्य नियोजनाने अभ्यास करावा. आदल्या दिवशी सर्व महत्वाचे साहित्य, हॉलतिकिट वगैरे सामान बॅगेत भरुन ठेवणे, आयत्या वेळी शोधाशोध केल्याने ताण वाढतो. संपूर्ण प्रश्नपत्रिका नीट, सावकास वाचणे, घाईने/वरवर वाचन नको. सिली मिस्टेक टाळण्या चा हा मार्ग आहे.,फक्त स्वतःच्या पेपरमध्ये लक्ष द्यावे.पेपर पूर्ण झाल्यावर तपासून बघायचा कंटाळा नको.,दीर्घश्वसन,डोळे बंद करुन स्वतःला सकारात्मक सूचना देणे. उत्तम,सकस,घरजे जेवन., पेपरच्या दिवशी सुध्दा केलेला माफक व्यायाम ८ तास रात्रभराची झोप, ताण निवारणासाठी केलेले थोड्या वेळाचे मनोरंजन, मानसिक शांती आणि एकाग्रतेसाठी ध्यान/योगनिद्रा/ प्राणायाम (१० ते १५ मिनिटे रोज) परीक्षा आहे, म्हणून संपूर्ण घराल वेठीस धरु नका. अबोला , टोमणे, अतीसूचना नकोत. भावनिक चढ–उतार होतील असे प्रसंग/ विषय जरुर टाळा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## पान १ वरून...

### ...तर भारतीय कापूस

पर्याय स्वीकारला तर देशातील कापूस शेतकऱ्यांचे नुकसान होईल आणि हा पर्याय नाकारला तर भारतीय टेक्सटाइल उद्योग १८ टक्के टॅरिफच्या ओझ्याखाली दबला जाणार आहे. याशिवाय, बांग्लादेश भारताकडून कापूस आयात कमी किंवा बंद करण्याचे संकेत देत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे दुहेरी संकट ओढवणार आहे.

------------

### 'विलीनीकरणा'वरून

की, ८० टक्क्यांहून अधिक आमदार विलीनीकरणाच्या बाजूने आहेत. तर प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले की, सध्या तरी दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा कोणताही अधिकृत प्रस्ताव नाही. मात्र, सुनेत्रा पवार राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर त्या या विषयावर अंतिम निर्णय घेतील. दिवंगत अजित पवार यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आणि पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.दरम्यान, वरिष्ठ नेते छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले की, सध्या विलीनीकरणाचा मुद्दा पक्षाच्या अजेंड्यावर नाही. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाला बळ देणे हीच पक्षाची प्राथमिकता आहे. त्या पक्षप्रमुख म्हणून स्थिरावल्यानंतर योग्यवेळी निर्णय घेतील, असे भुजबळ म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले की, शरद पवार गटाकडून अद्याप विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव आलेला नाही. अधिकृत प्रस्ताव आल्यास पक्ष त्यावर विचार करेल, असे ते म्हणाले. सध्या पक्ष भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएचा घटक असून, त्यात कायम राहण्याचा निर्णय असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले.

--------------

### राज ठाकरेंच्या भाषणांची

धमकावण्यात आले. आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला ठार मारण्याच्या धमक्या देणाऱ्या पोस्ट्सचा त्यांनी याचिकेत उल्लेख केला आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्या. गौतम अखंड यांच्या पीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने २०२४–२५ मधील कथित घटनांचा तपशील मागवला आहे. शुक्ला यांनी नमूद केलेल्या प्रत्येक घटनेचे स्वरूप, तारीख, ठिकाण आणि त्यासंबंधित पुरावे स्पष्टपणे मांडावेत, असे न्यायालयाने सांगितले. त्यानंतर पुढील सुनावणीसाठी प्रकरण तहकूब करण्यात आले. याचिकेत शुक्ला यांनी असा आरोप केला आहे की, राज्यात चालवल्या जात असलेल्या उत्तर भारतीयविरोधी मोहिमेला विरोध केल्यामुळे त्यांना लक्ष्य करण्यात आले. गुढीपाडवा मेळाव्यातील राज ठाकरे यांच्या भाषणानंतर बँका, मॉल्स आणि इतर ठिकाणी मराठी न बोलणाऱ्या हिंदी भाषिक कर्मचाऱ्यांना लक्ष्य करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. काही ठिकाणी हल्ल्यांच्या घटना घडल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. या सर्व घडामोडींमुळे सामाजिक तणाव वाढल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. शुक्ला यांनी मुख्यमंत्री, पोलिस महासंचालक, मुंबई पोलिस आयुक्त, राज्यपाल, केंद्रीय गृहमंत्री आणि वरिष्ठ पोलिस अधिका–यांना तक्रारी व ई–मेल पाठवले, मात्र अद्याप गुन्हा नोंदवला गेला नाही, असा दावा त्यांनी केला आहे. प्रशासनाची ही निष्क्रियता ही राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे उल्लंघन असल्याचे त्यांनी याचिकेत म्हटले आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली आहे.

------------

### मुंबईत 'एआय फॉर ॲग्री

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले असल्याने, या परिषदेत महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. या परिषदेत जागतिक बँक (वर्ल्ड बँक), आशियाई विकास बँक (एडीबी) आणि संयुक्त राष्ट्रांसारख्या (यूएन) नामांकित संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, शेतकऱ्यांचे नशीब बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा हा महाकुंभ ठरणार असल्याचे कृषि आयुक्तालयातून कळविण्यात आले आहे. या परिषदेत धोरणकर्ते आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती असणार आहे. त्यामध्ये उद्घाटन कार्यक्रमास इन्फोसिसचे सह–संस्थापक आणि आधार कार्डचे जनक नंदन निलेकणी, जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर, आशियाई विकास बँकेंचे संचालक ताकेशी उएदा, एच. टी. पारेख फाऊंडेशनचे अध्यक्ष दीपक एस. पारेख, केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे सचिव देवेश चतुर्वेदी, एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सौम्या स्वामीनाथन, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे मुख्य सल्लागार श्री. जे. सत्यनारायण, युनायटेड नेशन्स वुमनचे देशातील प्रतिनिधी कांता सिंह, इंडिया एआय मिशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक सिंग, युनायटेड नेशन्स वुमनचे देशातील प्रतिनिधी कांता सिंह, सह्याद्री फार्म्स अध्यक्ष विलास शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

---------

### मतभेद विसरून

राजकारणापेक्षा जनहित महत्त्वाचे असून सर्वांनी समन्वयाने काम केल्यास जिल्हा नक्कीच प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या भूमिकेचे नागरिकांमधून स्वागत होत असून महाशिवरात्रीच्या निमित्ताने दिलेला एकतेचा संदेश महत्त्वाचा मानला जात आहे.

-------------

### पंतप्रधान मोदींकडून महाराष्ट्रासह

यामध्ये महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा कसारा – मनमाड दरम्यानच्या ३ ऱ्या आणि ४ थ्या रेल्वे मार्गाचा समावेश आहे. यासोबतच दिल्ली अंबाला आणि बल्लारी होस्पेट या मार्गांवरही ३ रा आणि ४ था मार्ग उभारला जाणार आहे. या वाढीव रेल्वे क्षमतेमुळे वाहतुकीतील कोंडी कमी होऊन रेल्वे सेवेची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढणार आहे. यामुळे मालवाहतूक आणि प्रवासी दळणवळण अधिक सुलभ होईल. या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागाला होणार असून, सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या ३,९०२ गावांची संपर्क व्यवस्था सुधारणार आहे. विशेषतः महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, भावली धरण, श्री घाटणदेवी यांसारख्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांकडे जाणारा प्रवास आता अधिक सोयीचा होईल. तसेच कोळसा, पोलाद, लोह खनिज, सिमेंट आणि धान्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी हे मार्ग महत्वाचे ठरणार आहेत, ज्यामुळे प्रतिवर्ष ९६ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल. पर्यावरणाच्या दृष्टीनेही हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. रेल्वे हा वाहतुकीचा पर्यावरणपूरक पर्याय असल्याने, या प्रकल्पामुळे २२ कोटी लिटर इंधन आयातीची बचत होईल आणि १११ कोटी किलोग्रॅम कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन कमी होईल, जे सुमारे ४ कोटी झाडे लावण्याइतके प्रभावी ठरेल. याशिवाय, बांधकामाच्या काळात सुमारे २६५ लाख मनुष्यबळ दिवस इतकी मोठी रोजगार निर्मिती होणार असल्याने स्थानिकांना स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

------------

### केजच्या तरूणाचा येरमाळा

गेला होता. मित्रांनी दारू पाजून बारी पाहण्यासाठी नेले आणि तमाशा पाहून परत येताना जुन्या भांडणाचा राग मनात धरून जीवे मारल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. आरोपीनी लाथा बुक्क्यांनी सतीश मुंडे याच्या पोटावर आणि छातीवर मारहाण केली. यातच त्याचा मृत्यू झाला. शेख आजमुद्दीन, शेख रौफ, संजय गीते, मधुकर इंगळे आणि दत्ता तोंडे अशी आरोपींची नावे आहेत, पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली आहे. पोलिस उपनिरीक्षक स्वप्नील भोजगुडे तपास करीत आहेत.

------------

### पाकिस्तानसोबत क्रिकेट

होत आहे. या सर्व प्रकारावर मालेगाव इस्लाम पार्टीचे प्रमुख आणि माजी आमदार आसिफ शेख यांनी भाजपला काही प्रश्न विचारले. टिपू सुलतान देशद्रोही होते का? त्यांनी देशासाठी बलिदान दिले आहे. इंग्रजांविरुद्ध देशातून पहिला आवाज हा टिपू सुलतान यांनीच उठवला. त्यांच्या कार्याची दखल भारतीय संविधानाने घेतली आहे. भाजप आणि हिंदुत्ववादी संघटनांना एवढे वाईट का वाटते आहे? त्यांना तिरस्काराचे राजकारण करायचे आहे, दोन धर्मात तेढ निर्माण करण्याचे काम ते करत आहेत असा आरोप आसिफ शेख यांनी केला. शहरातील शांतता कायम राहावी यासाठी आम्ही तो फोटो मागे घेतला, परंतु भाजप त्यावर एवढा गोंधळ का करतेय असा प्रश्न आसिफ शेख यांनी विचारला. जो पाकिस्तान भारतावर हल्ला करतोय, भारतात दहशतवाद पसरवतोय त्यांच्याशी आपण क्रिकेट का खेळतोय? यांना फक्त कोट्यावधी रुपये कमवायचे आहेत म्हणून हे पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळतात. पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणे बंद करा, अशी मागणी आसिफ शेख यांनी केली.

-----------

### जनतेचे आरोग्य खेळ

सखोल संशोधन, जागतिक ट्रेंडचा अभ्यास आणि छोट्या उद्योगांशी चर्चा करायची आहे. यानंतर न्यायाधीश जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने स्पष्टपणे सांगितले की, आतापर्यंत तुम्ही जे काही केले, त्याचा कोणताही सकारात्मक परिणाम झालेला दिसत नाही. हा लोकांच्या आरोग्याशी निगडित अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे आणि तो केवळ चर्चेत अडकवून ठेवता येणार नाही. जगातील इतर देशांमध्ये अशा प्रकारे पाकिटाच्या समोरच्या बाजूला चेतावणी देणारी लेबल्स लावली जातात, मग भारतात का नाही?, असा सवालही खंडपीठाने केला.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात



### जिल्हास्तरीय स्काऊट गाईड मेळाव्यात शाहू प्राथमिक शाळेचे घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी

भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय बीड व शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिनांक १२ व १३ फेब्रुवारी २०२६ भारत स्काऊट गाईड भवन बीड येथे ३३वा स्काऊट गाईड मेळावा संपन्न झाला .या मेळाव्यात श्री छत्रपती शाहू प्राथमिक शाळा शाहूनगर बीड या शाळेने घवघवीत यश संपादन केले. या मेळाव्यात वेगवेगळ्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत जिल्हास्तरीय तीन पारितोषिक शाळेने पटकावले .यामध्ये फूड प्लाझा द्वितीय क्रमांक( सांघिक) तंबू निरीक्षण तृतीय क्रमांक (सांघिक) तर चित्रकला स्पर्धा वैयक्तिक कुमारी श्रेया कैलास वारे या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकावला. या मेळाव्यासाठी १६ गाईड गेल्या होत्या .सदर विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना यशस्वी करण्यात गाईड कॅप्टन श्रीमती कांबळे एस आर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी कार्याबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ बीड चे अध्यक्ष माननीय श्री रावसाहेब आगळे साहेब व माननीय श्री अजय पाटील साहेब सचिव यांच्यासह सर्व संचालक मंडळ सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले .व शुभेच्छा दिल्या तसेच जिल्हा संघटक माननीय श्री योगेश आवढाळ साहेब यांनी मार्गदर्शिका श्रीमती .कांबळे शोभा व सहभागी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले.

### वॉर्ड क्र. सात मधील रस्ते व पाण्याची दयनीय अवस्था; प्रशासनाचे मौन - सज्जाद सय्यद

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायत स्थापन होऊन दहा वर्षे पूर्ण झाली असून आतापर्यंत दोन वेळा नगरपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या. मात्र वॉर्ड क्र. सातमधील महासांगवी रोड ते क्रांतीनगर पाटाच्या वरच्या भागाकडे जाणारा महत्त्वपूर्ण रस्ता आजतागायत दुर्लक्षित राहिला आहे.

सदर रस्त्याची सध्याची परिस्थिती अत्यंत बिकट असून नाल्याचे पाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. तसेच रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असल्याने या रस्त्यावर ये-जा करणाऱ्या दुचाकीस्वार, महिला भगिनी, क्लासेस व शाळेतील विद्यार्थिनी वारंवार पडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. तुटलेल्या नाल्या, यामुळे गंभीर अपघात होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. पाटोदा शहरातील अनेक रस्त्यांची कामे झाली परंतु, या रस्त्याकडे नगरसेवकाच्या दोन टर्मच्या निवडणुका झाल्यातरी पण दुर्लक्ष का? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. त्याचप्रमाणे, या भागात १५ ते २० दिवस नळाला पाणी येत नाही. पाणी प्रश्नही गंभीर बनला आहे. वारंवार नगरपंचायत प्रशासनास ला माहिती देऊनही याकडे दुर्लक्ष? केले जाते असे नागरिकांचे म्हणने आहे. वॉर्ड क्र. सातमधील नागरिकांच्या रस्ते व पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी मागणी वॉर्ड क्र. सातमधील सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने सज्जाद भाई सय्यद, सामाजिक कार्यकर्ते तथा संचालक - सेवा सोसायटी पाटोदा यांनी केली आहे.

# महा पशुधन एक्सपोमध्ये उमेद अभियानातील महिला स्वयंसहायता गटांना बँक अर्थसहाय्य व अनुदानाचा प्रथम हप्ता मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वितरित

## उमेदच्या माध्यमातून अनेक महिला स्वतःच्या पायावर उभ्या आहेत -ना.पंकजाताई मुंडे

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथे दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ ते दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आयोजित महा पशुधन एक्सपो चे आयोजन करण्यात आलेले असून उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्थापन झालेले महाराष्ट्र राज्यातील व बीड जिल्ह्यातील ६८ महिला स्वयंसहायता गटांनी सहभाग घेतलेला आहे.

यामध्ये आपल्या उत्पादित मालाचे विविध वस्तूंची विक्री करत असताना मा. ना. श्रीमती पंकजाताई मुंडे व मा. श्री विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड, मा. श्रीमती संगीतादेवी पाटील प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड, मा. श्री शकील शेख जिल्हा अभियान व्यवस्थापक उमेद बीड यांनी सर्व स्टॉलची प्रत्यक्ष पाहणी करून उत्पादित वस्तूंचे व सहभागी महिलांचे भरभरून कौतुक केलेले आहे उत्कृष्ट दर्जाचे



वस्तू उत्पादन या ठिकाणी स्वतः बघितलेले आहेत तसेच उसाच्या रसापासून तयार केलेले कुल्फीचा आस्वाद ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला. लाकडी शोभेच्या वस्तूचे विशेष आकर्षण प्रदर्शनामध्ये दिसून आले. घोंगडी, शोभेच्या वस्तू, फुलहार विविध खाद्य पदार्थांचे पण आकर्षण वाटले. प्रदर्शन पहायला आलेल्या नागरिकांनी प्रचंड गर्दी करून प्रत्येक स्टॉल मधील वस्तूंची खरेदी केली. सर्वात जास्त विक्री रसाच्या कुल्फीची आणि लाकडी गाड्यांची व शोभेच्या वस्तूंची झालेली आहे.तसेच विविध १० स्वयं सहाय्यता समूहानी चहा, फराळ, नाष्टा, दही धपाटे, बाजरीची भाकरी भरीत, पिठलं, वडापाव, भेळ, पाणीपुरी, चाट, सलाड इ. चविष्ट रुचकर व स्वादिष्ट खाद्य पदार्थाची मोठया प्रमाणात विक्री केली. प्रदर्शन पाहायला आलेल्या महिला विद्यार्थी व नागरिकांनी खूप मोठया प्रमाणात प्रतिसाद खाद्य पदार्थांच्या स्टॉलला दिलेला दिसून आला.

दिनांक १४ फेब्रुवारी रोजी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व मा. ना. श्रीमती पंकजाताई मुंडे, मा. आ. श्री धनंजय मुंडे, मा. आ. रत्नाकर गुट्टे,सचिव पशुसंवर्धन विभाग यांच्या हस्ते तुळजाई महिला स्वयंसहायता गट जिरेवाडी तालुका बीड जिल्हा परळी या गटाला पंधरा लाख रुपये बँक अर्थ साह्य दुग्ध व्यवसाय व शेळी पालन साठी देऊन गटातील पदाधिकारी यांचा सन्मान केलेला आहे तसेच उमेद अभियानाच्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनी बर्दापुर तालुका आंबेजोगाई जिल्हा बीड यांना शासनाचा प्रथम हप्ता १२ लाख २७ हजार पाचशे रुपये देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील सर्व गटांचे मा. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भाषणामध्ये भरभरून कौतुक केले तसेच प्रतिनिधी यांचे सुद्धा भरभरून कौतुक करून गटातील महिला आज स्वतःच्या पायावर उभे राहून उत्पादित मालाची विक्री करताना खूप आनंद व्यक्त केलेला आहे.उमेदचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व सर्व ११ तालुक्यातील तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील सर्व अधिकारी कर्मचारी परिश्रम घेत आहेत....

महा पशुधन एक्सपो मध्ये उमेद च्या महिलां स्वयंसहाय्यता गटांनी स्वतः उत्पादित केलेले लाकडी बैलगाडी, खेळणी वस्तूंचे विशेष आकर्षण प्रदर्शनामध्ये आहे, गर्मीमध्ये थंड कुल्फीला नागरिकांनी प्रचंड प्राधान्य दिलेले आहे.गायीच्या शेणा पासून तयार केलेल्या अगरबत्ती,कांद्यापासून तयार केलेले साबण, पपई पासून तयार केलेले साबण,पेरूची वडी चे वेगळेपण दिसून आलेले आहे, इलेक्ट्रिक झुंबर व शोभेच्या वस्तू, बंजारा ड्रेस व विविध वस्तू, मेंढीच्या केसापासून तयार केलेली घोगळी, ईश्वरफुल कोरडे करून तयार केलेले फुलहार, विविध मसाले,मध, पापड सह खाद्यपदार्थ च्या रुचकर चवीसाठी नागरिकांचे प्रचंड प्रतिसाद प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरले आहे.

# सरपंच भागवत गव्हाणे यांनी केली वचननाम्याची वचनपूर्ती

## स्वखर्चाने एक लाख रुपये खर्चून मंदिर सभामंडपात बसवली फरशी

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड येथील युवा सरपंच भागवत गव्हाणे यांनी दिलेले आश्वासन पूर्ण करत स्वखर्चाने सुमारे एक लाख रुपये खर्चून मंदिर सभामंडपात फरशी बसवून वचननाम्याची वचनपूर्ती केली आहे.

धुनकवाड नं. २ येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर तसेच हनुमान मंदिर समोरील सभामंडपात ही फरशी बसवण्यात आली. दोन वर्षांपूर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीदरम्यान भागवत गव्हाणे यांनी मंदिरासमोर फरशी बसवण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता करत त्यांनी स्वतःच्या खर्चातून हे काम पूर्ण केले.



विशेष म्हणजे सुमारे पंधरा वर्षांपूर्वी आमदार निधीतून या सभामंडपासाठी निधी मंजूर झाला होता; मात्र काम अर्धवट अवस्थेतच राहिले होते. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी होती. ग्रामस्थांच्या मागणीनुसार सरपंच गव्हाणे यांनी पुढाकार घेत काम पूर्ण करून दिले.

त्यांच्या या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण असून, ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच भागवत गव्हाणे, चेअरमन लक्ष्मण काळे,माजी सरपंच अभिमान यादव, वसंत भोसले, श्रीरंग भोसले,भागवत भोसले,राणुजी काळे,रामकिशन भोसले, बळीराम काळे,उत्रेश्वर भोसले, वैजनाथ यादव,नवनाथ भोसले,बंडु यादव,त्रिंबक भोसले, शिवाजी करांडे,पत्रकार जगदीश गोरे,ज्ञानेश्वर यादव,दादाभाऊ भोसले,सुंदर भोसले,आप्पा बोडके,रंजीत भोसले, रमेश भोसले,बाबदेव काळे,बाबा करांडे,अशोक भोसले, संभाजी काळे,सुदाम डोंगरे, विश्वनाथ डोंगरे,विकास भोसले, नामदेव डोंगरे,गोरख काळे आदि उपस्थित होत.

## पान ६ वरुन...

### नगर परिषदेतील ८३ कोटींच्या

रेखा सरोदे,डॉ.सचिन देशमुख,पठाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.या तक्रारीमुळे सुरू असलेल्या कामांवर परिणाम होण्याची शक्यता असून खोदलेले रस्ते, धुळीचे प्रदूषण व वाहतुकीच्या अडचणींचा सामना नागरिकांना करावा लागणार आहे.

**ठळक मुद्दे :** ✻ ८३ कोटी रुपयांच्या विकासकामांवर १६ नगरसेवकांचा लेखी आक्षेप ✻ पाईपलाईनचे काम तात्काळ थांबवण्याची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी ✻ कंत्राटदाराकडून नागरिकांकडून १५०० रुपये वसुलीचा आरोप; चौकशीची मागणी ✻ होल्डिंग टेस्टिंगपूर्वी नळजोडणी देत असल्याचा आक्षेप; भविष्यात पाण्याचा दाब कमी राहण्याची भीती ✻ दर्जाहीन व कमी लांबीचे पाईप पुरवठ्याचा आरोप ✻ नुकतेच झालेले सिमेंट रस्ते फोडू नयेत,दोषदायित्व कालावधीचा मुद्दा उपस्थित ✻ भूयारी गटार योजनेला मंजुरीनंतरच पाईपलाईनचे काम करावे,अशी मागणी ✻ कामे न थांबवल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा ✻ विषय समित्यांची निवड दोन महिन्यांपासून रखडलेली ✻ एका बैठकीत ३५ विषय मांडल्याने प्रशासनावर स्थानिक नेत्यांची नाराजी.

### छोटेवाडीत संत सेवालाल

सतीश राठोड, पंडित राठोड, वैजनाथ कटके, बाळासाहेब कटके, हनुमान इंगळे, सुग्रीव सोळंके, संतोष दळवी, कालिदास लोंढे, सुखदेव चोरगे, उत्तरेश्वर इंगळे, अंगद सोळंके, किरण इंगळे, मोहन कटके, गणेश सोळंके, सर्जेराव कटके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी राम प्रधान, अजित कटके यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

### धावत्या कारने अचानक

शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. डॉ. भारत मेंगडे यांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.घटनेची माहिती मिळताच डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, सय्यद अख्तर, सुमित मुळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांच्यासह शिवाजी घरत, सतीश घरत, ऋषिकेश घरत, अभिषेक घरत व अक्षय घरत यांनी आग विझविण्यासाठी तत्परतेने मदत केली.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती.

### संत श्रीसेवालाल महाराजांची

पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, संत श्री सेवालाल महाराज यांनी सामाजिक ऐक्य आणि एकमेकांना मदत करण्याची दिलेली शिकवण ही केवळ बंजारा समाज नाही तर इतर समाजाने सुद्धा आत्मसात करावी. ऊसतोड मजूर आणि मुकादमांची मोठी संख्या असलेल्या बंजारा समाज बांधवांनी याच शिकवणीवर उच्च शिक्षण, नोकरी आणि उद्योग व्यवसायातही प्रगती केली असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सद्गुरू सेवालाल महाराज हे

साधत बांधवांशी आत्मीयतेने संवाद साधला. ''शिक्षण, एकता आणि स्वाभिमान हा आपल्या प्रगतीचा खरा मार्ग आहे. संत सेवालाल महाराजांचे विचार आचरणात आणल्यास समाज अधिक सक्षम व सुसंघटित बनेल,'' असे ते म्हणाले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, संत सेवालाल महाराज हे केवळ बंजारा समाजापुरते मर्यादित नसून सर्व समाजाचे दैवत आहेत. नागपूरला जाताना आपण आवर्जून पोहरादेवी तीर्थक्षेत्र येथे दर्शन घेतो व मुक्काम करतो. पोहरादेवी हे आपल्या सर्वांसाठी काशीप्रमाणे पवित्र स्थान आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात पोहरादेवी तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास झाला असून विशेष निधी व महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे या परिसराचा कायापालट झाला आहे. पोहरादेवीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र बनविण्याची दिशा देण्याचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांनीच केले असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देखील या ठिकाणी आणून उद्घाटन केले आहे असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी रावसाहेब शिरसाट, अशोक इथापे, रमेश तांदळे, राजेंद्र मस्के, भरत जाधव, मोहन आमटे, बंडू तळेकर, बबलू शेठ कुरेशी, महादेव थोरात, नवनाथ गव्हाणे, अशोक दहातोंडे, संतोष वायभासे, सुरेश माळी, गणेश वायभासे, जावेद शेख, साबळे साहेब, गोटीराम कोहक आदी मान्यवर उपस्थित होते. यावर्षी जयंती उत्सवानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या वतीने महापंक्तीचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादासाठी महापंगत देत अन्नदाता म्हणून सेवा बजावण्यात आली. संत सेवालाल महाराजांच्या चरणी विनम्र अभिवादन करून सामाजिक ऐक्य व परंपरेचा उत्सव ठरलेल्या या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**आ.धस यांनी बंजारा समाज बांधवांशी बंजारा भाषेत साधला संवाद**

संत जयंती सोहळ्यात आष्टी विधानसभेचे आमदार सुरेश धस यांनी बंजारा समाज बांधवांशी थेट बंजारा भाषेत संवाद साधत आत्मीयतेने भाषण केले.

यावेळी भाषण करताना त्यांनी सद्गुरु सेवालाल महाराज यांच्या शिकवणीचा उल्लेख करत आमदार सुरेश धस यांनी संत सेवालाल महाराजांचे उपदेश बंजारा भाषेत मांडत समाज बांधवांशी थेट संवाद साधला. त्यामुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आपल्या मातृभाषेत संवाद साधल्याने समाजबांधवांमध्ये आत्मीयता आणि आपलेपणाची भावना अधिक दृढ झाली.

### नगरपरिषदेत निधी हडपण्यासाठी

कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे नगरपरिषदेतील वेगवेगळे गट संघर्ष करताना दिसत आहेत. एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप, अविश्वासाचे ठराव,आंदोलनांचे इशारे आणि प्रशासनाकडे तक्रारी यामुळे वातावरण तापले आहे.

दरम्यान नगरपरिषदेत सुरू असलेल्या नगराध्यक्ष नगरसेवकांचा मनमानी कारभारावर तीव्र संताप व्यक्त करत सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ नेते सय्यद सलीमबापू यांनी निधी हडपण्यासाठी या सर्वच नगरसेवकांच्या पाठीराख्या नेत्यांनी नीतिमत्ताच गुंडाळून ठेवली आहे. दरम्यान नगराध्यक्षांसह सर्वच नगरसेवकांनी आपली जबाबदारी झुगारली आहे.जनतेने दिलेल्या विश्वासाचा घोर अपमान केला जात आहे.त्यामुळे नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांचे पद तात्काळ रद्द करून नगरपरिषदेवर प्रशासक नेमण्यात यावा,अशी ठाम मागणी सय्यद सलीमबापू यांनी केली आहे.

# वडवणी येथील पीएमसी जि.प.केंद्रीय प्राथमीक कन्या शाळेची सहल उत्साहात




किल्लेधारूर । प्रतिनिधी

वडवणी येथील पी एम सी जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक कन्या विद्यालयाची शैक्षणिक सहल ही उत्साहात व विविध स्थळांना भेटी देऊन संपन्न झाली यावेळी विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद लुटला व विविध स्थळांची पाहणी केली पी एम सी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळा वडवणी च्या वतीने बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक पर्यटन पूर्व व विविध स्थळांना भेटीसाठी सहल काढण्यात आली या शैक्षणिक सहलीत परळी येथील गोपीनाथ गडावर स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन गडाची सर्व पाहणी केली व येथील माहिती जाणून घेण्यात आली त्यानंतर परळी येथे श्री वैद्यनाथ मंदिरातील ज्योतिर्लिंगाचे दर्शनही घेण्यात परळी येथे राज्य पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सुरू असलेल्या राज्यस्तरीय महापशुधन एक्सपो मेळाव्यास भेट देऊन येथील सर्व स्टॉलची ही पाहणी करून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली त्यानंतर अंबाजोगाई येथील योगेश्वरी मंदिर हत्तीखाणा व आद्यकवी मुकुंदराज समाधी स्थळा सही भेट देण्यात आली धारूर येथील ऐतिहासिक किल्ल्यात भेट देऊन या किल्ल्याची ही सर्व माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली व नैसर्गिक व इतर स्थळांचाही आनंद विद्यार्थ्यांनी घेतला व उत्साहात व शांततेत ही सहल संपन्न झाली ही सहल यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक शेख सैलानी शिक्षक दिपकमाने,बाबासाहेब बडे, कैलास आळणे, एकनाथ बडे, मंजुषा कुलकर्णी, संजीवनी मुंडे, अनुराधा धनेश्वर आदीनी परीश्रम घेतले.

# महाशिवरात्री विशेष ग्रंथांना बीडकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने बीड शहरात विविध ठिकाणी सात्विक उत्पादने व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. बीड शहरात श्रीनिळकंठेश्वर महादेव मंदिर आणि परळी वैजनाथ येथे हे प्रदर्शन लावण्यात आले होते. महाशिवरात्री निमित्त मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सात्विक उत्पादने उपलब्ध व्हावी तसेच राष्ट्र, धर्म यांसारख्या विषयावरील ग्रंथाचा लाभ व्हावा या उद्देशाने हे प्रदर्शन लावण्यात आले होते. या प्रदर्शनाला शहरातील अनेक प्रतिष्ठित आणि मान्यवरांची उपस्थिती लाभली तसेच भाविकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.



या ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. परळी वैजनाथ येथे प्रसिद्ध उद्योजक श्री. नीलकंठ चाटे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले तर बीड नगरपरिषदेचे उप-नगराध्यक्ष श्री. विनोदजी मुळुक यांनी श्री. निळकंठेश्वर मंदिर येथील प्रदर्शनाला भेट दिली. या ठिकाणी धर्मशिक्षण, बालसंस्कार, साधना, हिंदुत्व, आयुर्वेद, राष्ट्ररक्षण इत्यादी विषयांचे ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले आहेत. तसेच सात्विक जीवनशैली यांविषयी मार्गदर्शन करणारे ग्रंथ व उत्पादने ठेवण्यात आली होती. महाशिवरात्रीच्या निमित्ताने अध्यात्मिक वातावरण अनुभवण्याची संधी भाविकांना मिळाली.

# धुनकेश्वरांच्या चरणी शरण गेल्यास दु:ख-दारिद्र्य दूर होते-अरविंद बाबा गिरी

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड येथील ग्रामदैवत धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त माजी उपसरपंच बाबुराव भोसले यांच्या वतीने गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या शिवपुराण कथेची सांगता महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी मोठ्या भक्तिभावाने करण्यात आली. या प्रसंगी श्री.दत्त संस्थान प. दहिफळ/ प.पारगाव येथील ह.भ.प.अरविंद बाबा गिरी महाराज यांनी आपल्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.

उपदेश करताना त्यांनी सांगितले की, पुराणांची वाणी ही दुरितांचे तिमीर नाहीसे करणारी तेजस्विनी आहे. मानवाच्या अंत:करणात शुद्ध श्रद्धा असेल तरच जीवनाचे रहस्य उमगते. विकल्पाच्या



## महाशिवरात्री निमित्त धुनकवाड येथे शिवपुराण कथेची भक्तिमय सांगता

डोळ्यांनी नव्हे तर श्रद्धेच्या स्वयंप्रकाश दीपाने जीवन उजळते. पुराणांचे चिंतन करून त्यानुसार आचरण केल्यास मनुष्याची वृत्ती सात्विक, स्वभाव सोज्वळ आणि वर्तन प्रामाणिक होते. मन स्फटिकासारखे स्वच्छ व गंगेप्रमाणे निर्मळ बनते.

आजच्या गतीमान युगात वेदशास्त्रांचा अभ्यास सर्वांना शक्य नसला तरी पुराणांमधील कथा सहज समजण्यासारख्या आहेत. त्या कथांमधून जीवनातील व्यथा सहन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. शिवमहापुराणाच्या माध्यमातून जीवनाला योग्य दिशा मिळू शकते व दुःखदायक जीवन सुखमय होऊ शकते. सुख हे बाह्य वस्तूंवर अवलंबून नसून अंतर्मनातील ज्ञानावर अवलंबून असते. ज्ञानामुळे कर्तृत्वाचा अहंकार नाहीसा होतो.

कर्तृत्वाचा अहंकार आणि फलाशा सोडून भक्तीमार्गावर चालल्यास हृदयातून निस्वार्थ भक्ती प्रकट होते. हे निस्वार्थ प्रेम हीच मानवी जीवनातील सर्वात मोठी दैवी देणगी असल्याचे त्यांनी नमूद केले. जो अनन्यभावाने भगवान शिव धुनकेश्वरांच्या चरणी शरण येतो, त्याचे दुःख-दरिद्र्य धुनकेश्वर दूर करतात. शरणागत भक्तांचे पाप-ताप नष्ट करणारे दैवत म्हणजे धुनकेश्वर असल्याचेही त्यांनी सांगितले. कथेच्या माध्यमातून विविध दृष्टांत देत सामाजिक प्रबोधन करताना अरविंद बाबा गिरी महाराजांनी विनोदी शैलीत जीवनातील अनेक रहस्ये उलगडून सांगितली. कार्यक्रमास ग्रामस्थ व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मोठेवाडी जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेची शैक्षणिक सहल संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील पी.एम.श्री.जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बडीबाडी (मोठेवाडी) शाळेची शैक्षणिक सहल दि.१४ फेब्रुवारी शनिवार रोजी संपन्न झाली.



हि सहल शाळेतील ८७ विद्यार्थ्यांना घेऊन सहलीसाठी ऐतिहासिक व वैज्ञानिक माहिती घेण्याच्या उद्देशाने महत्त्वाचे ठिकाण असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर हे जागतिक दर्जाचे उल्कापातामुळे तयार झालेले खार्या पाण्याचे विवर येथे विद्यार्थ्यांना सुमारे ५२ हजार वर्षापूर्वीच्या भौगोलिक इतिहासासह परिसरातील दैत्यसुदन सारखी प्राचीन मंदिरे, जैवविविधता आणि वन्यजीव अभयारण्याची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची शैक्षणिक व आनंददायी सहल यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम शिंदे, शिक्षक उत्तमराव ढवळे,आर.पी. राठोड,गेनू पवार, वसंत टाकणखार, सतीश डोणे,

शिवाजी व्यवहारे, शाळेच्या शिक्षिका रुपाली बडवे, मनीषा गुळवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य यांनी सहकार्य केले.

# ऊस हार्वेस्टरवर मिळणार सबसिडी; केंद्राची हार्वेस्टर अनुदान योजना चर्चेत

पुणे / प्रतिनिधी

राज्यात ऊसतोड मजुरांची संख्या घटत असताना शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण अभियान अंतर्गत ऊस हार्वेस्टर खरेदीसाठी तब्बल ३५ लाख रुपयांचे अनुदान दिले जात आहे.

राज्यात ऊसतोड मजुरांची संख्या घटत चालल्याने शेतकऱ्यांसमोर ऊस तोडणीचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) खरेदीसाठी तब्बल ३५ लाख रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यासाठी ९०० हार्वेस्टर यंत्रांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, आतापर्यंत ६०० यंत्रांची खरेदी पूर्ण झाल्याची माहिती साखर सहसंचालक कार्यालयाने दिली. ऊस शेतीत वेळेवर तोडणी होणे अत्यंत महत्त्वाचे असते. उशिरा तोडणी झाल्यास उसाचे वजन घटते, साखरेचा



उताराही कमी होतो आणि त्यामुळे शेतकरी व कारखान्यांचे नुकसान होते. मात्र, ऊसतोड मजुरांची उपलब्धता दिवसेंदिवस कमी होत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण अभियान अंतर्गत हार्वेस्टर खरेदीसाठी अनुदान योजना राबवली आहे. ऊस हार्वेस्टर यंत्राची किंमत साधारणतः ८० ते ९० लाख रुपये आहे. या यंत्रासाठी केंद्र सरकारकडून ३५ लाख रुपये अनुदान दिले जात आहे. उर्वरित रक्कम बँक कर्जातून उभारणे बंधनकारक आहे. नियमित कर्जहप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांनाच अनुदान पात्रता मिळते. या योजनेत अर्जांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर केली जाते.

**९०० यंत्रांचे उद्दिष्ट; ६०० ची खरेदी पूर्ण**

केंद्र सरकारने राज्याला ९०० हार्वेस्टर अनुदानावर देण्याचे उद्दिष्ट दिले आहे. यापैकी ६०० यंत्रांची खरेदी पूर्ण झाली असून उर्वरित यंत्रांसाठी प्रक्रिया सुरू आहे. यांत्रिकीकरणामुळे वेळेत तोडणी, मजुरांवरील अवलंबित्व कमी होणे आणि उसाचा दर्जा टिकवून ठेवणे शक्य होणार आहे. तसेच कारखान्यांना वेळेत ऊसपुरवठा झाल्याने उत्पादन प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

# 'या' आजारामुळे होऊ शकतो जनावरात अचानक गर्भपात!

जनावरातील गर्भपात हा गाभण कालावधीत वेगवेगळ्या कारणामुळे कोणत्याही वेळी होऊ शकतो. काही वेळा निरोगी गाभण जनावरामध्ये अचानक गर्भपात झाल्याचे दिसून येते. गर्भपाताची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत तरी होणारा हा गर्भपात लेप्टोस्पायरोसिस या आजारामुळे होतो. गाभण जनावरांमध्ये चौथ्या महिन्याच्या पुढील आणि गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या जनावरांमध्ये गर्भपाताची समस्या दिसून येते.



आजाराचा प्रसार :लेप्टोस्पायरोसिस हा जीवाणूजन्य आजार असून १५० हून अधिक प्राण्यांच्या प्रजातीमध्ये हा रोग दिसून येतो. जास्त दूध देणाऱ्या जनावरांमध्ये लेप्टोस्पायरोसिस आजाराचा प्रादुर्भाव अधिक दिसून येतो. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने गवत, पिण्याचे पाणी, चारा यावर आजारी जनावरांचे मूत्र, गर्भाशयाचा स्त्राव पडल्याने होत असतो. बाधित जनावरांचे मूत्र हे प्रसारास प्रमुख कारणीभूत घटक असते. एखाद्या जनावराला या रोगाची बाधा झाल्यास आजारपणानंतर जवळपास ४० दिवस या रोगाचे जंतु मुत्रा वाटे बाहेर पडत असतात. हा आजार सर्व पाळीव प्राणी, तसेच जनावरांपासून माणसांमध्येही याचा संसर्ग होत असतो. अति पावसाच्या, पाणथळ भागात जेथे पाणी साठून राहते तसेच ज्या ठिकाणी हवेत आर्द्रतेचे जास्त प्रमाण आहे अशा ठिकाणी लेप्टोस्पायरोसिस या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो.

या आजाराचे जीवाणू उंदराच्या शरीरात सुप्त अवस्थेत असतात. त्यांच्या मलमूत्राद्वारे झपाट्याने या आजाराचा प्रसार होत असतो.

आजाराची लक्षणे : या आजाराचा प्रादुर्भाव तत्काळ तीव्र, तत्काळ सौम्य आणि दीर्घकालीन तीव्र या तीन टप्प्यात दिसून येतो. एक महिन्यापर्यंतची वासरे या रोगाला पटकन बळी पडतात. गाभण जनावरांमध्ये चौथ्या महिन्याच्या पुढील आणि गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या जनावरांमध्ये गर्भपाताची समस्या दिसून येते. कोणतीही लक्षणे नसताना अचानकपणे जनावरांचा गर्भपात होणे हे या आजाराचे मुख्य लक्षण आहे. या आजाराचे निदान जनावरांच्या लघवीमधील रोगजंतूचा प्रादुर्भाव तपासून करता येते.


प्रतिबंधात्मक उपाय : घूस, उंदीर यांची संख्या कमी करण्यासाठी गोठ्यात तसेच आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता ठेवावी. शरीरावर जखम असल्यास त्वरित उपचार करावेत. लक्षणांनुसार प्रभावी प्रतिजैविके पशु वैद्यकांच्या सल्ल्याने द्यावीत.

# दुधाळ जनावरांना मोकळे चरायला सोडणे ठरते नुकसानदायक

राज्याच्या अनेक भागांमध्ये शेतीसोबतच आता डेअरी व्यवसाय वेगाने वाढत आहे. डेअरी व्यवसायाच्या मदतीने शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मोठा आर्थिक हातभार लागत आहे. मात्र, बऱ्याचदा शेतकऱ्यांसमोर प्रश्न असतो की, दुधाळ जनावरांना नेमका गोठ्यात खुट्यावर बांधून चारा द्यावा? की मग त्यांना मोकळे चरायला सोडावे? ग्रामीण भागात अनेक शेतकरी आपल्या जनावरांना मोकळ्या माळरानावर चरायला घेऊन जातात. मात्र, अशा पद्धतीने दुधाळ जनावरांना मोकळे चरायला सोडल्याने शेतकऱ्यांना कसे नुकसान होते? याबाबत माहिती नसते. ती जाणून घेतल्यास चांगला फायदा होऊ शकतो.

असे होते शेतकऱ्यांचे नुकसान : पावसाळयाच्या दिवसांमध्ये ग्रामीण भागात नदीकाठी, गावठाणात किंवा मग पडीत माळरानावर मोठ्या प्रमाणात गवत उगवलेले असते. ज्यामुळे पशुपालक आपल्या जनावरांना मोकळे चरायला घेऊन जातात. किंवा मग पीक काढल्यानंतर अशा शेतांमध्ये गवत मागे शिल्लक राहते. ते चारण्यासाठी शेतकरी जनावरे शेतात घेऊन जातात. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात चाऱ्याची बचत होते. मात्र, दुधाळ जनावरांना असे मोकळे चरायला सोडणे योग्य ठरत नाही.

जिकरीची पायपीट : दुधाळ जनावरांना माळरानावर चरायला घेऊन गेल्यास, त्यांची दिवसभरात अनेक किलोमीटरची पायपीट होते. ज्यामुळे त्यांची ऊर्जा नष्ट होऊन, त्यांना थकवा जाणवतो. त्याचा थेट परिणाम हा दूध उत्पादनावर होऊन, शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता असते.पशुतज्ज्ञांचे मत : पशुतज्ज्ञांच्या मते दुधाळ जनावरांना मोकळे चरायला सोडणे ही




अयोग्य पद्धत आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना नकळत अनेक प्रकारे नुकसान होत असते.

जनावरांचे आरोग्य : दुधाळ जनावरांना बांधून खुट्यावर चारा दिल्याने, जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. जनावराचे आरोग्य उत्तम असेल त्याचा दूध वाढीसाठी फायदा होतो. ज्यामुळे जनावरांना मोकळे सोडण्याऐवजी बांधून चारा देणे योग्य ठरते. विषारी गवताचा धोका : याशिवाय पावसाळ्याच्या दिवसामध्ये दुधाळ जनावरांना मोकळे चरायला सोडल्याने ते एखादे विषारी गवत खाऊ शकतात. जे आरोग्यास हानिकारक असते. ज्यामुळे अशा जनावराच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही तर दुधाळ जनावरांना सर्वाधिक आजार हे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये होत असतात. ज्यामुळे मोकळे चरायला सोडणे जनावरांच्या जीवावर देखील बेतू शकते. चाऱ्याचे नियोजन आणि बचत : परिणामी, शेतकऱ्यांना खुंट्यावर जनावरांना चारा देताना मोठ्या प्रमाणात चाऱ्याची गरज भासणार आहे. अशावेळी शेतकरी हे आपल्या शेतामध्ये एका विशिष्ट क्षेत्रात चाऱ्याचे उत्पादन घेऊ शकतात. यामध्ये गिनी गवतासह, शेतकरी ज्वारी, मका यांसारख्या चारा पिकांची टप्प्याटप्प्याने गरजेनुसार पेरणी करू शकतात. याशिवाय कुट्टी करून साठवून देखील ठेऊ शकतात.

# फळगळ थांबविण्यासाठी योग्य प्रमाणात अन्नद्रव्यांचा वापर

आंबा मोहर व फलनाचा कालावधी कमी आणि संवेदनशील असतो. या काळात झाडातील मागणी वाढलेली असते, पण वातावरणीय चढ-उतार, धुके, आर्द्रता, थंडी, उष्णता यामुळे परागीभवन आणि अन्नद्रव्य वहनात अडथळे येतात. जमिनीतून दिलेली खते लगेच उपलब्ध होत नाहीत. फवारणीने अन्नद्रव्ये थेट कार्यरत भागांपर्यंत लवकर पोहोचतात.

फळगळ ही हापूस आंब्यातील उत्पादनावर थेट परिणाम करणारी गंभीर समस्या आहे. फुलोरा व फळधारणा चांगली असूनही पुढील टप्प्यात मोठ्या प्रमाणात फळे गळल्यास ते अन्नद्रव्य असंतुलनाचे लक्षण मानले जाते. बोरॉनची कमतरता, पालाशाचा अभाव, कॅल्शिअम कमी असणे, अन्नद्रव्य वहनातील अडथळा, पाण्याचा ताण तसेच उष्णता व कोरडे वारे ही फळगळ वाढविणारी प्रमुख कारणे आहेत. बोरॉन पेशी विभाजन व अन्नद्रव्य वहन सुधारून फळ टिकवण्यास मदत करतो, तर पालाश देठाची मजबुती वाढवून पेशींतील पाणी संतुलन राखतो. कॅल्शिअम फळाला मजबुती देतो तसेच साठवण कालावधी वाढण्यास मदत मिळते. (स्वतंत्र फवारणी), जस्त हार्मोन संतुलन राखतो आणि मॅग्नेशिअम ऊर्जा निर्मिती टिकवतो. फळगळ सुरू झाल्यावर तत्काळ परिणामासाठी पानांमार्फत संतुलित पोषण देणे हा सर्वात प्रभावी उपाय ठरतो. मिश्र फवारणी म्हणजे फवारणी टँकमध्ये खते, कीटकनाशके/बुरशीनाशके व स्टिकर एकत्र मिसळणे. मात्र सर्व उत्पादने परस्पर सुसंगत नसतात. कॉम्पिटॅबिलिटी न समजता मिश्रण केल्यास रासायनिक अभिक्रिया होऊन गाळ/अवक्षेप तयार होतो किंवा अन्नद्रव्ये निष्क्रिय होतात; त्यामुळे फवारणी करूनही झाडाला फायदा होत नाही व कधी नुकसानही होते. उदा. कॅल्शिअम अधिक स्फुरदमुळे स्फुरद निष्क्रिय होतो, कॅल्शिअम अधिक गंधकमुळे द्रावण जड होऊन नोझल चोक होतात. तांबे काही सूक्ष्म अन्नद्रव्ये निष्क्रिय करू शकतो. एकाच वेळी अति खते दिल्यास करपा व फळगळ



वाढते.

आम्रशक्तीचा वापर : चुकीच्या मिश्रणामुळे अपेक्षित फुलोरा/फळधारणा मिळत नाही, फळगळ थांबत नाही, खर्च वाढतो आणि नफा कमी होतो. याउलट योग्य सुसंगतता राखल्यास अन्नद्रव्ये सक्रिय राहतात, शोषण जलद होते आणि कमी मात्रेतही अपेक्षित परिणाम मिळतो. हे लक्षात घेऊन सर्व घटकांची परस्पर सुसंगतता तपासून डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने 'आम्रशक्ती' हे बहुपोषक फवारणी द्रावण विकसित केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी लक्षात घेऊन तयार केलेल्या या उत्पादनात १००० पेक्षा अधिक कॉम्पिटॅबिलिटी चाचण्या करून घटकांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे मिश्रणातील अयोग्य रासायनिक अभिक्रिया, गाळ तयार होणे किंवा अन्नद्रव्ये निष्क्रिय होण्याचा धोका टाळला जातो. आम्रशक्तीमध्ये फुलोरा, फळधारणा व फळवाढ या संवेदनशील टप्प्यांत आवश्यक असलेली सर्व प्रमुख व सूक्ष्म अन्नद्रव्ये संतुलित आणि सुसंगत स्वरूपात उपलब्ध आहेत. परिणामी फवारणी सुरक्षित, प्रभावी ठरते आणि शेतकऱ्यांना कमी मात्रेतही अपेक्षित व सातत्यपूर्ण परिणाम मिळतात. आम्रशक्तीमुळे मोहर टिकाऊ राहतो, फलन सुधारते, सुरुवातीची फळगळ कमी होते आणि फळांची गुणवत्ता एकसारखी वाढते. आम्रशक्तीचा अपेक्षित व सातत्यपूर्ण परिणाम मिळण्यासाठी योग्य मात्रा, पद्धत आणि वेळ महत्त्वाची आहे. फवारणी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा करावी. द्रावण एकसारखे करून संपूर्ण पर्णसंभार ओलसर होईल अशी फवारणी करावी. १० ते १५ दिवसांचे अंतर ठेवून टप्प्यानुसार फवारणी केल्यास परिणाम अधिक स्थिर राहतो. हापूस आंब्यात फवारणी करताना कॉम्पिटॅबिलिटी समजणे अत्यावश्यक आहे. असुसंगत मिश्रणामुळे गाळ/अवक्षेप, फेस, नोझल चोक, पानांवर डाग किंवा करपा येऊ शकतो आणि खर्च असूनही फायदा मिळत नाही. कॅल्शिअम आणि तांबे आधारित उत्पादने बहुतेक अन्नद्रव्यांशी अभिक्रिया करतात; म्हणून ती नेहमी स्वतंत्र फवारणीत द्यावीत. इतर मिश्रणांसाठी जार टेस्ट करणे सुरक्षित आहे. आम्रशक्ती कॉम्पिटॅबिलिटी तपासून विकसित केल्यामुळे मिश्रणातील चुका कमी होतात; मात्र कॅल्शिअम आणि तांबे आम्रशक्तीसोबत मिसळू नयेत.

सुरक्षित मिश्रणाचा नियम : कॅल्शिअम आणि तांबे आधारित उत्पादने स्वतंत्र वापरावे. इतर मिश्रण शिफारशीप्रमाणे आणि शक्य असल्यास जार टेस्ट करूनच वापरावे.

जार टेस्ट पद्धत : मिश्र फवारणी करायची असल्यास (आवश्यक तेव्हाच) लहान प्रमाणात जार टेस्ट केल्याने कॉम्पिटॅबिलिटीची अडचण आधीच कळू शकते. ही चाचणी साधी आहे. खर्च व नुकसान वाचवते. स्वच्छ पारदर्शक काचेची बाटली घ्या आणि त्यात १ लिटर पाणी भरावे. जी उत्पादने मिसळायची आहेत. ती शिफारस प्रमाणात क्रमाने ओतावीत आणि प्रत्येक टप्प्यानंतर हलवावे. फेस, गाळ, कण, उष्णता वाढणे, थर तयार होणे किंवा द्रावण घट्ट होणे दिसल्यास ते मिश्रण टाळा. १५ ते ३० मिनिटे द्रावण स्थिर राहते का ते पाहा; स्थिर असल्यासच टँकमध्ये मिश्रण करण्याचा विचार करा.

अन्नद्रव्यांची भूमिका : अन्नद्रव्यांची नावे माहिती असणे पुरेसे नसून ती विशिष्ट टप्प्यावर का महत्त्वाची आहेत हे समजणे गरजेचे आहे. स्फुरद ऊर्जावहन प्रक्रियेत सहभागी असल्याने फुलकळी निर्मितीपासून फलनापर्यंत ऊर्जा पुरवतो. पालाश पेशींतील दाब व पाणी संतुलन राखून साखर/अन्नद्रव्यांचे वहन सुधारतो; त्यामुळे ताण व्यवस्थापन, फूल-फळ टिकाव आणि फळवाढीत तो निर्णायक ठरतो. बोरॉन आणि जस्त कमी प्रमाणात लागूनही मोठा परिणाम देतात. बोरॉन परागनलिकेची वाढ, पेशीभिंत मजबुती व वहन सुधारतो, तर झिंक संप्रेरक/एन्झाईम क्रियांमुळे मोहर एकसारखा ठेवतो. कॅल्शिअम अचल असल्याने वेळेवर उपलब्धता महत्त्वाची; तो पेशीभिंती मजबूत करून फळांची मजबुती आणि साठवण कालावधी वाढवतो.

मॅग्नेशिअम क्लोरोफिलचा घटक असल्याने विशेषतः ढगाळ वातावरणात प्रकाशसंश्लेषण टिकवून ठेवण्यास मदत करतो.




## महत्वाच्या घटना

१६५९ : पहिला धनादेश ब्रिटीश बँकेतून काढण्यात आला, तो नॅशनल वेस्टमिन्स्टर बँकेत जपून ठेवण्यात आला आहे.
१७०४ : औरंगजेबाने राजगड जिंकून त्याचे नाव नबीशाहगड असे ठेवले.
१९१८ : लिथुएनियाने (रशिया व जर्मनीपासून) स्वातंत्र्य जाहीर केले.
१९५९ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या अध्यक्षपदी
१९६० : अमेरिकी अणुपाणबुडी ट्रायटन ने पाण्याखालून पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास प्रस्थान केले.
१९६९ : मिर्झा गालिब यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्ताने डाक तिकीट जारी केल्या गेले.
१९८५ : लेबनॉनमध्ये हिजबोल्ला या कट्टरपंथीय शिया मुस्लिम संघटनेची स्थापना.
१९८२ : कोलकत्ता येथे जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.
२००८ : प्रसिद्ध गायक नितीन मुकेश यांना मध्य प्रदेश सरकार कडून लता मंगेशकर पुरस्कार देण्यात आला.
२००८ : बिहार च्या नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री कन्या विवाह योजनेचे उद्घाटन करण्यात आले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२२ : जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचे स्थापक निचिरेन यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १२८२)
१७४५ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव पेशवे – मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा, १६ व्या वर्षी पेशवेपदावर विराजमान झालेला अत्यंत कर्तबगार पेशवा. पानिपतच्या युध्दानंतर विस्कटलेली मराठेशाहीची घडी त्यांनी बसविली. (मृत्यू: १८ नोव्हेंबर १७७२)
१८२२ : बोटांचे ठसे, रंगांधळेपणा आणि स्त्रियांच्या सौंदर्यावर संशोधन करणाऱ्या सर फ्रान्सिस गाल्टन यांचा जन्म.
१८७६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे – भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (मृत्यू: ६ मे १९६६)
१९०९ : मॅकडोनाल्ड चे सहसंस्थास्थापक रिचर्ड मॅकडोनाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १४ जुलै १९९८)
१९२० : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता आई.एस. जोहर यांचा जन्म.
१९४१ : उत्तर कोरिया चे माजी प्रशासक किंम जोंग इल यांचा जन्म.
१९४८ : भारतीय चित्रपट कलाकार हैदर अली यांचा जन्म.
१९५४ : मायकेल होल्डिंग – वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू
१९६१ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध गायक शेखर सेन यांचा जन्म.
१९६४ : बेबेटो – ब्राझीलचा फुटबॉलपटू
१९७७ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट अभिनेता दर्शन थुगुडीपा यांचा जन्म.
१९७८ : वासिम जाफर – भारतीय क्रिकेटपटू.
१९९७ : प्रसिद्ध कब्बडी प्लेयर परदीप नरवाल चा जन्म

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४४ : धुंडिराज गोविंद ऊर्फ 'दादासाहेब' फाळके – भारतीय चित्रपट उद्योगाचे जनक, लेखक, छायाचित्रकार, दिग्दर्शक, संकलक, वेशभूषाकार, कलादिग्दर्शक इ. अनेक जबाबदार्या ते सांभाळत असत. (जन्म: ३० एप्रिल १८७० त्र्यंबकेश्वर, नाशिक, महाराष्ट्र)
१९५६ : मेघनाद साहा – खगोलभौतिकशास्त्रज्ञ व संसदसदस्य. तार्यांच्या वातावरणाचे तापमान आणि आयनीभवन यांचा संबंध स्पष्ट करणारा सिद्धांत त्यांनी मांडला. भारताचे स्वत:चे राष्ट्रीय पंचांग त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले. (जन्म: ६ आक्टोबर १८९३)
१९६८ : नारायणराव सोपानराव बोरावके – कृषी शिरोमणी, पहिले मराठी साखर कारखानदार, पुणे, सोलापूर व नगर जिल्ह्यांत अनेक संस्था व उद्योग त्यांनी उभे केले. संशोधित फळांच्या उत्पादनास त्यांनी प्रोत्साहन दिले. १९३३ मध्ये त्यांना 'रावसाहेब' तर १९४६ मध्ये त्यांना 'रावबहादूर' हे किताब मिळाले. शेतीच्या आधुनिकीकरणावर त्यांनी भर दिला. (जन्म: १७ ऑक्टोबर १८९२)
१९९४ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक – जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक (जन्म: ४ जुलै १९१२)
१९९६ : आर. डी. आगा – उद्योगपती, थरमॅक्स उद्योगसमुहाचे संस्थापक.
२००० : बेल्लारी शामण्णा केशवन – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, 'इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर'चे पहिले संचालक.
२००१ : रंजन साळवी 'पिंजरा', 'सवाल माझा ऐका', 'केला इशारा जाता जाता' आदी मराठी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शक.

# ज्वारी-मकातील अळ्यांचे नियंत्रण

ज्वारी पिकाच्या फुलोरा ते दाणे पक्व होण्याच्या अवस्थेत कणसातील अळया या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. तसेच प्रादुर्भाव जास्त असल्यास झाड वाळते. अळ्या दुधाळ अवस्थेतील दाणे खातात. विष्ठेमुळे दाण्याची प्रत खराब होते. म्हणून २० अळ्या प्रति कणीस आढळल्यास, नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी २ मिली प्रति लिटर पाणी मिसळून याप्रमाणे फवारणी करावी.

पहिला पंधरवडा - पक्ष्यांपासून संरक्षण करावे (पक्षीथांबे /मचाण बसविणे). मका पीक तुरे लागण्याच्या अवस्थेत असून या काळात पाणी देण्याचे नियोजन व्यवस्थित करता आले पाहिजे. मक्याची पाने रुंद व लांब असतात. बाष्पीभवन क्रियेमुळे पानांतून अधिक पाणी बाहेर टाकले जात असल्याने या पिकास पाण्याची गरज अधिक असते. मका पीक पाण्याच्या ताणास संपूर्ण कालावधीमध्ये संवेदनशील आहे. संवेदनशील अवस्थांच्या वेळी पाण्याचा ताण पडू देऊ नये, अन्यथा उत्पादनात लक्षणीय घट येते. पीक फुलोऱ्यात आणि दाणे भरत असताना कमी अंतराने भरपूर पाणी द्यावे. म्हणजे कणसे भरण्यास मदत होते. मका फुलोऱ्यात असताना जमिनीत पाण्याचे प्रमाण कमी असल्यास स्त्रीकेसर बाहेर पडण्यास उशीर झाल्यामुळे बीजधारणा कमी होऊन उत्पादन घटते. म्हणून पीक तुऱ्यावर आणि स्त्रीकेसर अवस्थेत असताना पाण्याची आवश्यकता अधिक असते.




# प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना समजून घेतले पाहिजे

## पालकत्व ही खूप मोठी जबाबदारी–जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने पालकत्व या महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन सिद्धार्थ द फर्न हॉटेल मध्ये करण्यात आले होते. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थापक द क्युरिअस पॅरंटचे हरप्रीत सिंग ग्रोवर उपस्थित होते. कार्यक्रमास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, पालकत्व ही अत्यंत मोठी आणि संवेदनशील जबाबदारी आहे. आपल्या मुलांना समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे, त्यांच्या क्षमतांचा विकास करणे आणि योग्य मूल्यांची




जपणूक करणे ही प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे. बदलत्या काळात मुलांशी संवाद साधणे आणि त्यांच्याशी विश्वासाचे नाते निर्माण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मार्गदर्शन करताना संस्थापक द क्युरिअस पॅरंटचे हरप्रीत सिंग ग्रोवर यांनी सांगितले की, प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना समजून घेतले पाहिजे. जन्मानंतर प्रत्येक बाळ जीवनाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत असते. सुरुवातीला ते रडण्याच्या माध्यमातून भावना व्यक्त करते; परंतु वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर त्याच्या भावना आणि प्रतिसादाची पद्धत बदलत जाते.

''लहान बाळ हे या पृथ्वीवरील सर्वात स्मार्ट 'एआय' आहे,'' असे सांगत त्यांनी मुलांच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेची जाणीव पालकांना करून दिली. मुलांच्या आयुष्यातील प्रत्येक वळणावर पालकांनी सजगपणे डोकावून पाहिले पाहिजे. जिथे मुलांना सहकार्याची गरज आहे तिथे त्यांना आधार द्यावा आणि जिथे सुधारणा आवश्यक आहे तिथे प्रेमाने मार्गदर्शन करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिस्त लादण्याऐवजी समजून घेण्याची आणि संवाद साधण्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रम दोन सत्रांमध्ये पार पडला. पहिल्या सत्रात धवल मिश्रीकोटकर, रोशन रुणवाल व डॉ. मोनिका मोरे यांनी हरप्रीत सिंग ग्रोवर यांच्या समवेत आजच्या युगातील पालकत्वाची जबाबदारी, पालकांसमोर उभ्या राहणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना यावर सविस्तर चर्चा केली.दुसऱ्या सत्रात शैक्षणिक विषयांवर श्रीमती मनिषा पुरी व श्रीमती शितल भाला यांनी हरप्रीत सिंग ग्रोवर यांच्याशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी कोणती भूमिका घ्यावी यावर मार्गदर्शन घेतले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जालना फर्स्टचे गोविंद गोयल व राहुल अग्रवाल यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व यशस्वी नियोजन जिल्हाधिकारी फेलो इशिता चेचाणी यांनी विशेष प्रयत्न केले. सदर कार्यशाळेमुळे पालकांना मुलांच्या भावविश्वाचा सखोल अभ्यास करण्याची आणि आधुनिक काळात जबाबदार पालकत्व कसे पार पाडावे याची दिशा मिळाल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली.

## अभियंता अझरुल्लाह हाश्मी यांना 'राहत खिदमत-ए-खल्क' पुरस्कार



लातूर। प्रतिनिधी

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण योगदानासाठी प्रिय व्यक्ती असलेले अभियंता अझरुल्लाह हाश्मी यांना प्रतिष्ठित '' राहत खिदमत–ए–खल्क'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मेहताबसब अजमोदीन पटवारी एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभियंता हाश्मी यांना सामाजिक सेवा, गरजूंना मदत, शैक्षणिक मदत आणि सामाजिक जागरूकता अशा विविध क्षेत्रात त्यांच्या प्रशंसनीय आणि समर्पित कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यांनी वेळोवेळी गरीब आणि वंचितांना मदत केली आहे, समाजात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांनी त्यांच्या सेवाभावाचे, समर्पणाचे आणि समाजाप्रती असलेल्या वचनबद्धतेचे कौतुक केले. वक्त्यांनी सांगितले की अभियंता हाश्मी हे खरे हिरो आहेत. हाश्मी यांचे कार्य समाजातील तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत आहे आणि त्यांचे योगदान सामाजिक एकता आणि मानवी मूल्यांना बळकटी देते. यावेळी उद्योजक हिमायत पटेल, नगरसेवक मौलाना कलीमुल्ला, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे,माजी मुख्याध्यापक शेख रसूल गुरुजी, शेख फकीर पाशा, डॉ. आर. आर. शेख, डॉ. शोएब सय्यद, नगरसेवक प्रतिनिधी बासिद शेख,ॲड. मुजाहिद पटेल, समीउद्दीन पटेल, ॲड. इकबाल शेख, ॲड. मजहर शेख, इंजिनिअर अझहर शेख,पत्रकार जाफर पटेल,संपादक मजहर पटेल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. औसा येथील ऑर्बिट प्री–प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेह संमेलन निमित्त हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, यावेळी पालक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यानगर, यवतमाळमध्ये एटीएसची छापेमारी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

एटीएसने राज्यभरात मोठी कारवाई केली आहे. यवतमाळमध्ये पुसद आणि उमरखेडमध्ये १४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी एटीएसने छापे टाकले आहेत. दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून अनेक तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचाली आढळल्यानंतर एटीएसचे सर्च ऑपरेशन राबवण्यात येत आहे. जवळपास २१ ठिकाणी एटीएसचे रविवार सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरू होते. या कारवाईत अनेकांना ताब्यात घेऊन चौकशी केली जात असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. दरम्यान या कारवाईने राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगरच्या मुकुंदनगरमध्ये एटीएसने छापेमारी केली. मध्यरात्री एटीएसने ही छापेमारी केली. गोपनीय पद्धतीने मुकुंदनगरमधील नागरिकांची चौकशी करण्यात आली. मुकुंदनगर हा मुस्लिमबहुल भाग म्हणून ओळखला जातो. गेल्या दोन ते तीन वर्षांत औरंगजेबाचे उदात्तीकरणाचा प्रयत्न असो वा पाकिस्तानच्या घोषणा असोत अहिल्यानगर हे चर्चेत आले आहे. यापूर्वी अहिल्यानगरमध्ये अल्पसंख्याक समाजाच्या तरुणांची माथी भडकवण्याचे प्रयत्न पण समोर आले होते. त्यानंतर आता एटीएसच्या छापेमारीने पुन्हा एकदा हा भाग चर्चेत आला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात एटीएसची २० पथके दाखल झाली आहेत. एटीएसकडून उमरखेड, पुसदमध्ये संशयितांची कसून चौकशी करण्यात येत आहे. या कारवाईत वरिष्ठ आयपीएस अधिकारीही सहभागी झाले आहेत. राज्यात एटीएसने रात्रभर गोपनीय कारवाई केली. उमरखेड आणि पुसदमध्ये एटीएसची २० पथके तळ ठोकून आहेत. रात्री त्यांनी अनेकांची चौकशी केली. तर काही तरुणांना, संशयितांना ताब्यात घेतले आहे. विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात रात्रभर कारवाई करण्यात आली. ही कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीने करण्यात आली.

अहिल्यानगरमध्ये एटीएसने दहशतवादी कारवायासंदर्भात संपर्कात असलेल्या काही संशयितांची कसून चौकशी केली. रात्री संशयितांच्या घरावर छापा टाकण्यात आला. पोलिसांनी यावेळी स्थानिक नागरिकांकडून कसून चौकशी केल्याची माहिती पण समोर येत आहे.

## मल्टिस्टेट घोटाळ्यात फरार संचालक मयुर वैद्य, नितीन तुपे यांनी घातला साडेचार कोटी रुपयांना गंडा?

अहिल्यानगर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात साईराम मल्टिस्टेट आर्थिक घोटाळ्याने प्रचंड खळबळ उडवली असतानाच या प्रकरणात भगवान बाबा मल्टिस्टेट च्या घोटाळ्याची एकूण रक्कम सुमारे १०० कोटी रुपयांच्या घरात असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अहिल्यानगर, शेवगाव, श्रीरामपूर, पाथर्डी तसेच शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी व बोधेगाव येथे भगवानबाबा मल्टिस्टेट च्या शाखा कार्यरत होत्या. या शाखांमधून ठेवीदारांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाल्याची चर्चा जील्ह्याभरात आहे.

अहिल्यानगर च्या आर्थिक गुन्हे शाखेने या संशयास्पद व्यवहारांची सखोल पडताळणी करून आणि या कायद्यान्वये भगवान बाबा मल्टिस्टेटशी झालेल्या कोट्यवधींच्या व्यवहारांचे धागेदोरे शोधून यातील फरार संशयित आरोपी फरार भामटे सर्वेसर्वा मयुर रंगनाथ वैद्य आणि नितीन सोपानराव तुपे यांनी या सर्व पैशांचे व्यवहार मयुर वैद्य व नितीन तुपे यांनी भगवान बाबा मल्टिस्टेटमार्फत हेराफेरी करून आपल्या नातेवाईकांना कोट्यवधींचे नियमबाह्य कर्जवाटप करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सक्रिय सहभाग असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असूण ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये वाचवण्या ऐवजी मल्टिस्टेट संस्थांनी एकमेकांच्या माध्यमातून फसवणुकीचा आर्थिक खेळ खेळला का? स्थानिक गुन्हे शाखा एल.सी.बी. आर्थिक गुन्हे शाखा ई.ओ.डब्लू. या तपास यंत्रणा मोठ्या आर्थिक साखळीचा पर्दाफाश कधी करणार? याकडे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## बीडचा सार्वजनिक जयभीम महोत्सव डीजेमुक्त साजरा होणार

### पहिल्या बैठकीत समाजातून जमा झाले ७ लाख रुपये

बीड। प्रतिनिधी

संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बहुतांश देशात साजरी होते. त्या अनुषंगाने राज्यात बीडच्या सार्वजनिक जयभीम महोत्सवाने देखील स्वबळावरची एक आदर्श जयंती म्हणून लौकिक मिळविला आहे. तसेच यंदाचा जयभीम महोत्सव हा डीजेमुक्त साजरा होणार असून पहिल्याच बैठकीत तब्बल ७ लाख रुपये वर्गणी समाजातून जमा झाली आहे. विशेषतः म्हणजे यावर्षीचा हा जयभीम महोत्सव युवकांच्या हाती देण्यात आला आहे.त्यामुळे याहीवर्षी आगळीवेगळी जयंती साजरी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आत्तापासूनच जय्यत तयारीला लागली आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे शनिवार (ता.१४) फेब्रुवारी रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत २०२५ च्या जयंतीचा जमा–खर्च आणि शिल्लक–बाकी सादर करण्यात आली. तसेच सर्वानुमते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ ची नियोजन समिती घोषित करण्यात आली. त्यामध्ये मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, विजय समुद्रे, महादेव इनकर, प्राचार्य पंडित मुने, उद्धव बनसोडे, ॲड.राजेश शिंदे, स्वप्नील चोपडे, संतोष गायकवाड, दयानंद सरपते,ॲड.तेजस वडमारे,ॲड. नितिन वाघमारे, सोनू सरवदे, प्रा.रोहित डोंगरे, संजय जाधव, प्राचार्य प्रदीप गाडे, प्रा.प्रेमानंद सिरसट, विनोद कांबळे, सुरेश साबळे, कल्याण भंडारे, अशोक ठोकळ, प्रा.अशोक गायकवाड, शरद मगर, यांचा समावेश आहे. यावेळी विचार मंचावर तुलसी समूहाचे संचालक प्रा.प्रदिप रोडे, राजू जोगदंड, गौतम चोपडे, भगवान कांडेकर, बबन वडमारे, अजय सवाई, शितलकुमार सुकाळे, प्रा. राम गायकवाड, अरूणाताई आठवले, मायताई मिसळले, अनिता डोंगरे, वैशाली शिंदे, भारत कांबळे, अविनाश जोगदंड, संतोष जाधव, नाना मस्के, शाम वीर, आदींची उपस्थित होती. या बैठकीचे सूत्रसंचालन प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांनी केले. जयभीम महोत्सव निमित्ताने आयोजित बैठकीला आंबेडकरी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही विचारांची जयंती आहे, केवळ जल्लोषाची नाही. त्यामुळे यंदा जयंती डीजेमुक्त साजरी करून शिस्त, प्रबोधन आणि सामाजिक संदेशाला प्राधान्य दिले जाईल,तसेच शहरातील सर्व जयंती उत्सव समितीने मिरवणुकीत विविध देखावे सादर करावेत, त्यांना सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून पारितोषिक देण्यात येईल, असे आवाहन बैठकीचे अध्यक्ष तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी सांगितले.

## पाथर्डी तालुक्यात १९ वर्षीय तरुणीचे अपहरण ; दोघांविरुद्ध गुन्हा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

पाथर्डी–तालुक्यातील तिसगाव येथून शुक्रवारी (दि.१४) १९ वर्षीय तरुणीचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. मात्र गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत अवघ्या एका तासात तरुणीची सुटका करून तिला पालकांच्या स्वाधीन केले. या प्रकरणातील आरोपी मात्र फरार झाले असून त्यांना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी शनिवारी तिसगाव येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

शुक्रवारी संबंधित तरुणी तिसगाव येथील एका ब्युटीपार्लरमध्ये आली होती. ती बाहेर पडताच स्कॉर्पिओ गाडीतून दोन महिला व एक पुरुष आरोपी खाली उतरले. त्यांनी तरुणीला मारहाण करून जबरदस्तीने गाडीत बसवले. या वाहनाच्या मागे आणखी एक चारचाकी वाहन असल्याची माहिती साक्षीदारांनी दिली. काही नागरिकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी संबंधित मुलगी मनोरुग्ण असल्याचे सांगून तिला जबरदस्तीने घेऊन जात पळ काढला. आरोपींनी तरुणीचा मोबाईल बंद करून तिला वाहनाच्या मागील बाजूस बांधून ठेवल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. मुलगी घरी परतली नसल्याने पालकांनी शोधाशोध केली असता अपहरणाची घटना उघडकीस आली. त्यांनी तत्काळ पाथर्डी पोलीस स्टेशन येथे धाव घेऊन तक्रार दाखल केली.पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी



तातडीने तीन पथके तयार करून शोधमोहीम सुरू केली तसेच अहिल्यानगर व पुणे पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. काही वेळासाठी तरुणीचा मोबाईल सुरू झाल्याने आरोपी पुण्याच्या दिशेने जात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पुणे पोलिसांना सतर्क करण्यात आले. शिक्रापूर येथे पोलिसांनी सापळा रचला. मात्र आपल्या मागावर पोलीस असल्याचे लक्षात येताच आरोपींनी तरुणीला चाकण चौकात सोडून पळ काढला. शिक्रापूरचे पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी तरुणीला ताब्यात घेत सुरक्षित केले. या कारवाईत पोलीस निरीक्षक पुजारी यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुहास गायकवाड, लक्ष्मण पवार, अक्षय वडदे, सागर बुधवंत, बाबासाहेब बडे आणि ज्ञानेश्वर इलक यांनी सहभाग घेतला. दरम्यान, मुलीच्या पित्याने दिलेल्या फिर्यादीवरून राणी सरोदे (रा. निवडुंगे) व अन्य दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते साडेसात मीटर काँक्रिटचे होणार –भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

राजूर चौफुलीजवळील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते खूपच अरुंद असून ते खूपच खराब झालेले असल्यामुळे वाहतुकीसाठी योग्य राहिले नाहीत, मोठमोठे खड्डे पडले आहेत, याठिकाणी पाणी वाहून जाण्यासाठी दोन मीटर सिमेंट नालीसह साडेसात मीटर चा सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार होणार असे भास्कर आबा दानवे यांनी एका निवेदनाद्वारे कळविले आहे.

निवेदनात पुढे असे नमूद आहे की, राजूर चौफुली जवळील उड्डाणपुला खालील दोन्ही बाजूनी जाणारे रस्ते खूपच अरुंद असून फक्त चार मीटरचे रस्ते आहे, ते ही अत्यंत खराब झालेले असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्ते वाहतुकीयोग्य राहिले नाहीत, तास ना तास वाहतूक ठप्प होत असल्यामुळे वाहनधारक व नागरिकांना याचा खूपच मनस्ताप सहन करावा लागत आहे. भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी नॅशनल हायवे चे मुख्य अभियंता यांना फोन द्वारे संवाद साधून, रस्त्यावरील अडचणी सांगितल्या आणि सदरील उड्डाणपुला खालील दोन्ही बाजुने जाणारे रस्ते पाणी



वाहून जाण्यासाठी दोन मीटर च्या सिमेंट नालीसह साडेसात मीटर चे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करून देण्यासाठी सुचना केली. त्यानुसार नॅशनल हायवे चे मुख्य अभियंता यांनी अकोला विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांना सदरील ठिकाणी पाहणी करून अहवाल सादर करा असे निर्देश दिले होते. त्यानुसार दिनांक १३/०२/२०२६ रोजी नॅशनल हायवे चे अकोला विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण व उपअभियंता श्री.कचाळे यांनी राजूर चौफुली जवळील उड्डाणपुला खाली येऊन दोन्ही बाजूनी जाणाऱ्या रस्त्यांची पाहणी केली. त्याठिकाणी वरच्या बाजूने मार्केट कमिटी पासून १५० ते २०० हेक्टर मधील पावसाळ्याचे पाणी त्याठिकाणी जमा होत असल्याने पावसाळ्याचे पाणी वाहून जाण्यासाठी त्याठिकाणी दोन्ही बाजूने दोन मीटर सिमेंट नालीसह साडे सात मीटर चा सिमेंट कॉन्क्रीट रस्ता करणे गरजेचा असल्याबाबत त्यांनी नॅशनल हायवे चे मुख्य अभियंता यांना कळविले.

त्यानुसार मा.मुख्य अभियंता यांनी तात्काळ अंदाजपत्रक तयार करून मंजुरीसाठी सादर करावे असे निर्देश श्री.कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांना दिले. यावेळी त्यांच्या समवेत महानगरपालिकाचे तांत्रिक सल्लागार इंजी.विष्णू डोंगरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री मा.श्री.रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वीय सहायक गोवर्धन कोल्हे यांची उपस्थिती होती.

## सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी निलंबीत

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाणे हद्दीत दोनवेळा गोळीबारासह गंभीर गुन्हे वाढल्याने सहायक पोलीस निरीक्षक विजय माळी यांचे निलंबन करण्यात आले आहे.

याबाबत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले की, सहायक पोलीस निरीक्षक विजय माळी यांनी सोनई पोलीस ठाण्यात नेमणुकीस असताना त्यांना मागील सहा महिन्याच्या कालावधीत पोलीस ठाणे हद्दीतील दाखल झालेल्या गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्ये प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी स्पष्ट सूचना देवूनही त्या सूचनांचे पालन केले नाही. त्यामुळे सोनई पोलीस ठाणे हद्दीत गंभीर स्वरुपाचे अग्नीशस्त्रांसह खून, खुनाचा प्रयत्न असे गुन्हे दाखल असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांची खात्याअंतर्गत चौकशी सुरु करण्यात आली असून चौकशीवर विपरीत परिणाम होवू नये यासाठी शासन सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे. सहायक पोलीस निरीक्षक विजय माळी यांच्या चौकशीसाठी श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांची नियुक्ती केली असून चौकशी करुन ते अहवाल जिल्हा पोलीस अधिक्षकांना देणार आहेत.

सोनई पोलीस ठाणे हद्दीत अंमळनेर येथे व त्यानंतर घोडेगाव येथे गोळीबाराच्या घटना घडल्या.

घोडेगाव येथे एकाचा बळी गेला. त्यामुळे सोनई पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते. आता सोनईत कर्तव्यकठोर अधिकार्याची नेमणूक करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नगर परिषदेतील ८३ कोटींच्या विकासकामांवर १६ नगरसेवकांचा आक्षेप

## पाईपलाईन काम तात्काळ थांबवण्याची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा दिला इशारा






माजलगाव । प्रतिनिधी

नगरपालिका निवडणुकीपासून ते विषय समित्यांच्या निवडीपर्यंत माजलगाव पालिकेत राजकीय घडामोडींची मालिका सुरूच आहे.आता आमदार प्रकाश सोळंके गट आणि 'तुतारी'चे मोहन जगताप गटातील एकूण १६ नगरसेवकांनी सुमारे ८३ कोटी रुपयांच्या विकासकामांवर गंभीर आक्षेप नोंदवत मुख्याधिकारी सुंदर बोंडा यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे. त्यामुळे पालिकेच्या कारभाराबाबत शहरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगरसेवकांनी दिलेल्या निवेदनात मे.संतोष कन्स्ट्रक्शन नांदेड यांच्या माध्यमातून सुरू असलेले पाईपलाईनचे काम तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. आक्षेपांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, रस्ते उखडून पाईपलाईन टाकल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शासनाच्या योजनेनुसार पाणीपुरवठा जोडणी मोफत देण्याचा संकल्प असताना कंत्राटदार नागरिकांकडून प्रत्येकी १५०० रुपये घेत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. याबाबत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. होल्डिंग टेस्टिंगपूर्वी नळजोडणी देणे शासकीय नियमात बसत नसल्याचा आरोप करत भविष्यात शेवटच्या घरापर्यंत पाण्याचा पुरेसा दाब पोहोचणार नाही, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.तसेच नागरिकांना देण्यात येणारे पाईप कमी लांबीचे व दर्जाहीन असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

ज्या ठिकाणी सिमेंट रस्ते नुकतेच झाले आहेत, त्या ठिकाणी दोषदायित्व कालावधी संपण्यापूर्वी रस्ते फोडू नयेत,अशी मागणीही करण्यात आली आहे. मागील पाच वर्षांत ज्या भागात नवीन पाईपलाईन टाकण्यात आली आहे,त्या भागात पुन्हा काम करण्याची गरज काय,असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. शहरात भूयारी गटार योजनेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचाराधीन असल्याने त्यास मंजुरी मिळाल्यानंतरच पाईपलाईनचे काम करावे,अशीही मागणी आहे. विविध ठिकाणी पाईपलाईनसाठी खोदलेले क्रॉसिंग तात्काळ दुरुस्त करण्याची मागणीही करण्यात आली आहे.वरील सर्व आक्षेपांचा विचार करून सुरू असलेली कामे थांबवावीत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा नगरसेवकांनी दिला आहे.निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) गटनेते इमरान खान,नगरसेवक शरद यादव, नीलाबाई इतापे,सुचिता होके,गंगाबाई भोसले, विजय जगताप तसेच आमदार प्रकाश सोळंके गटाचे राज सय्यद अहमद,राहुल लंगडे,शेख महीन अहमद,रेहानाबी शेख,सय्यद रफीक अली,वैशाली शेटे, विजय शिंदे, ◀◀ पान ३ वर

### विषय समित्यांचा निर्णय रखडला

नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारल्यानंतर १५ दिवसांत विषय समित्या जाहीर करणे अपेक्षित असते.मात्र अंतर्गत राजकीय पेच आणि गटबाजीमुळे दोन महिन्यांनंतरही विषय समित्यांची घोषणा झालेली नाही.त्यामुळे पालिकेतील प्रशासनिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे दिसून येते.

### मुख्याधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती

अलीकडील बैठकीत प्रशासनाने एकाच वेळी सुमारे ३५ विषय मांडल्याने काही स्थानिक नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आगामी पाच वर्षांत पुन्हा बैठक घ्यायची नाही का, असा सवाल उपस्थित करत मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. त्यावर मुख्याधिकाऱ्यांनी विषय नगराध्यक्षांच्या अधिकारक्षेत्रातील असल्याचे स्पष्ट केल्याची माहिती सूत्रांनी दिली. एकूणच ८३ कोटींच्या विकासकामांवरून पालिकेत पुन्हा एकदा राजकीय संघर्ष उफाळून आला असून त्याचे परिणाम थेट नागरिकांवर होण्याची चिन्हे आहेत.



बीड : अ.भा.छावा चे बीड जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांना वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवतांना महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री डॉ.तानाजीराव सावंत. सोबत अ.भा.छावाचे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष अशोक मोरे, गोविंद जाधव(सरपंच), मिट्टन कोटुळे, पप्पू लांडे, दत्ता काशीद, गणेश जाधव, पप्पू शिंदे, अभिजीत मस्कर बाळासाहेब काशीद, पप्पू मस्के, अंकुश खडके, सतीश काळे, सतीश क्षीरसागर, अविनाश पवार,गजानन पवार संभाजीनगर, बाळू सुर्वे,गिरीश करवा व इतर छावा मित्रपरिवार.



## धावत्या कारने अचानक घेतला पेट

### मेंगडे डॉक्टर दांपत्य बालंबाल बचावले

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील डॉ. भारत मेंगडे व डॉ. प्रतिभा मेंगडे हे आज रविवारी सकाळी सव्वा ६ वाजण्याच्या सुमारास बोरखेड येथील शेतात बोअरवेल गाड्या आल्याने शेताकडे निघाले होते. महाजनवाडी फाट्यावर त्यांच्या व्हिस्टा इंडीका (एमएच २३ वाय २३२१) या कारमधून अचानक धूर निघू लागल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ गाडी थांबवून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

क्षणातच गाडीने पेट घेतला. वायर ◀◀ पान ३ वर

## ना.पंकजाताई मुंडे यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन महाशिवरात्री निमित्त परळीत शिवभक्तांची मांदियाळी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले.**



प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी आज महाशिवरात्री निमित्त राज्याच्या तसेच देशाच्या कानाकोपर्यातून लाखो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी पंकजाताई मुंडे यांनी वैद्यनाथ मंदिरात जाऊन ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेतले. वैद्यनाथ देवल कमिटीचे अध्यक्ष व तहसीलदार व्यंकटेश मुंडे, विश्वस्त राजेश देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

पंकजाताई मुंडे दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर मंदिराच्या प्रांगणात जमा झालेल्या महिला, युवक, युवती व सर्व सामान्य नागरिकांनी त्यांचेसोबत सेल्फी घेण्यासाठी त्यांना एकच गराडा घातला. सेल्फीसाठी प्रत्येकांची झुंबड उडाली होती, पंकजाताईंनी देखील यासाठी सर्वांना आवर्जून मनसोक्त वेळ देत सर्वांची इच्छा पूर्ण केली तसेच भाविकांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या.

भाविकांना खिचडीचे वाटप

भाविकांना उपवासाची खिचडी मोफत वाटप करण्यासाठी परळी नगरपरिषद तसेच भाजपचे युवा नेते निळकंठ चाटे यांनी उभारलेल्या स्टॉलला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली, त्यांच्या हस्ते दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले.

## छोटेवाडीत संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी, रामनगर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अंगदराव कटके हे होते तर उपसरपंच बाळासाहेब चव्हाण, ग्रामविकास अधिकारी डी. के. ताटे, दिलीप राठोड, ◀◀ पान ३ वर

## महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर मंदिर येथे आज महाशिवरात्री निमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिराच्या गाभाऱ्यात तसेच दर्शन मंडप आणि परिसरात फुलांच्या माळांनी आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.



संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज तसेच शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचे भाविकांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. मंदिर रोडवर विविध व्यावसायिकांनी दुकाने थाटली असून भाविकांसाठी साबुदाणा खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. यात्रेनिमित्त पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला असून लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, गणेश परझने तसेच होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.महाशिवरात्री निमित्त मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या दि.१६ सोमवार रोजी शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या सुश्राव्य कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बेलेश्वर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## कर्जतच्या आदर्श पत्रकार संघ पुरस्कार कार्यक्रमाला उपस्थित रहा-आंबेकर,घरत

बीड । प्रतिनिधी




मराठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या पत्र महर्षी रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर, जिल्हा समन्वयक अभिमान्यू घरत यांनी केले आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण कर्जत येथे दिनांक २२ फेब्रुवारी रोजी रविवारी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन मध्ये सकाळी ११ वाजता आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख सर हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला संभाजीनगर विभागातील सर्व तालुका आणि जिल्हा पत्रकार संघाने उपस्थित राहावे असे आवाहन हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर, जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत यांनी केले आहे.

## संत श्रीसेवालाल महाराजांची जयंती बदामराव पंडितांच्या उपस्थितीत साजरी

गेवराई । प्रतिनिधी

संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या उपस्थितीमध्ये त्यांच्या संपर्क कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.



दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या गेवराई येथील संपर्क कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह युवा नेते रोहित पंडित, माजी जि प सदस्य शामराव राठोड, नगरपरिषद सभापती शेख शेहदाद, कैलास राठोड, संतराम महाराज, विनायक चव्हाण, शेख सुलेमान, राजू टकले, सुरज भुतडा, विकास राठोड, दत्ता राठोड, ज्ञानेश्वर राठोड, विजय राठोड, राजू जाधव, बजरंग सानप, पंडित पवार, अमोल सुतार, जगन्नाथ गीते, शेख नविद, शिवाजीराव चव्हाण, रामदास मस्के, आप्पासाहेब शिंदे, जगन्नाथ जाधव, काशिनाथ बनसोडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ◀◀ पान ३ वर

## एलएलबी सीईटी नोंदणीस १५ मार्चपर्यंत मुदतवाढ-डॉ.तांदळे

बीड । प्रतिनिधी

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एलएलबी (५ वर्ष) अभ्यासक्रमांच्या प्रवेश नोंदणीला १५ मार्च २०२६ मुदतवाढ देण्यात आली आहे. १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार पर्यंत या अभ्यासक्रमास २६ हजार ६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तर या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ८ मे २०२६ रोजी होणार आहे. गेल्या वर्षी या प्रवेश परीक्षेमध्ये ३५ हजार ७४ विद्यार्थिनी नोंदणी केली होती. या अभ्यासक्रमांसाठीचा ऑनलाईन अर्ज,सविस्तर माहिती पुस्तिका कक्षाच्या ...या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर संपर्क साधून एलएलबी (५ वर्ष ) अभ्यासक्रमा साठी सीईटी नोंदणी १५ मार्च २०२६ रविवार पर्यंत करण्याचे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

## संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

परळी । प्रतिनिधी

परळी येथील लोहमार्ग पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाली असून या पदोन्नती निमित्ताने त्यांचा लोहमार्ग पोलीस ठाणे परळी येथे सत्कार करून खांद्यावर स्टार वाढविण्यात आला आहे.



अनेक वर्षांपासून लोहमार्ग पोलिसांत कार्यरत असलेली संजय काळे हे कर्तव्यदक्ष, निष्कलंक व्यक्तिमत्त्व असून नुकताच पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग पोलीस संभाजी नगर यांनी परळी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय काळे यांच्यासह संभाजी नगर विभाग अंतर्गत इतर ७ पोलीस अधिकारी यांचे पदोन्नतीचे आदेश पारित केले. या आदेशानव्ये संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती होत लोहमार्ग पोलीस ठाणे परळी येथेच नियुक्ती देण्यात आलेली आहे. संजय काळे यांच्या या पदोन्नती निमित्ताने रविवार दि १५ रोजी पोलीस ठाण्यात सत्कार करत गणवेशवर स्टार लावण्यात आला. या प्रसंगी ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघमोडे यांच्यासह इतर कर्मचारी, काळे कुटूंबिय उपस्थित होते. संजय काळे यांच्या पदोन्नती निमित्त मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला आहे.

## सद्गुरू सेवालाल महाराज हे थोर समाज-सुधारक आणि क्रांतिकारी संत -आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील देऊळगाव घाट लमाण तांडा येथे सद्गुरु सेवालाल महाराज जयंती २०२६ विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाली. तमाम गोर बंजारा बांधव तसेच तालुक्यातील १३ तांड्यांच्या वतीने आयोजित या सार्वजनिक जयंती उत्सवात मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.



यावेळी आष्टी विधानसभेचे भाजप आमदार सुरेश धस म्हणाले की, संत सेवालाल महाराज हे १८व्या शतकातील महान संत व समाजप्रबोधनकार होते. त्यांनी बंजारा समाजातील अंधश्रद्धा, मद्यपान, अन्याय व कुप्रथांविरुद्ध ठाम भूमिका घेत समाजाला शिक्षण, एकता व स्वाभिमानाचा मार्ग दाखवला. तांड्यांना स्थैर्य देणे, शेती व संघटनासाठी प्रेरणा देणे, स्त्रियांचा सन्मान राखणे तसेच जलसंधारण,प्राणीसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणे ही त्यांची प्रमुख कार्ये होती. सत्य, नैतिकता आणि समाजहित यांवर आधारित जीवन जगण्याचा त्यांनी दिलेला उपदेश आजही तितकाच मार्गदर्शक आहे. ''सद्गुरु सेवालाल महाराज हे थोर समाजसुधारक आणि क्रांतिकारी संत म्हणून पूजले जातात,'' असे प्रतिपादन त्यांनी केले.सावरगाव फाटा ते लमाणतांडा, देऊळगाव (घाट) या मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर मूर्तीपूजन व भोग भंडारा पार पडला. बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडविणारी पारंपरिक सांस्कृतिक नृत्ये सादर करण्यात आली. आमदार धस यांनी बंजारा भाषेत संवाद ◀◀ पान ३ वर

## नगरपरिषदेत निधी हडपण्यासाठी नेत्यांनी नीतिमत्ता गुंडाळली; जनतेचा विश्वासघात!

### नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांचे पद रद्द करून प्रशासक नेमावा - सय्यद सलीमबापू

माजलगाव । प्रतिनीधी

येथील नगरपरिषद सध्या प्रचंड गोंधळ,राजकीय संघर्ष,चित्रविचित्र आघाड्या,युत्या आणि गंभीर आरोपांच्या भोवऱ्यात सापडली आहे.शहरातील मूलभूत प्रश्न सुटण्याऐवजी सत्ताधारी कोण? आणि विरोधक कोण?काहीच कळायला मार्ग राहिला नसुन येथे आरोप-प्रत्यारोप,गटबाजी आणि राजकीय कुरघोड्या वाढल्या असून त्याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.दरम्यान निधी हडपण्यासाठी येथील सर्वच नेत्यांनी नीतिमत्ता गुंडाळली आहे. तर लोकांनी निवडून दिलेल्या नगराध्यक्ष नगरसेवकांनी जनतेचा विश्वासघात केला आहे.त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांचे पद रद्द करून नगर परिषदेत प्रशासक नेमावा अशी मागणी सय्यद सलीमबापू यांनी केली आहे.



माजलगाव नगर परिषदेत महाविकास आघाडीच्या ताब्यात नगरपरिषद दिली.परंतु उपनगराध्यक्ष पदाच्या निवडी दरम्यान याठिकाणी विचित्र राजकारण खेळल्या गेले.सर्वच पक्ष एकत्र आल्याचे दिसले.शहराच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलोत असं यावेळी सांगण्यात आले.परंतु या घटनेला महिना उलटला तरी विकासाबाबत काहीच होताना दिसत नाही.उलट या घटनेतून राजकीय युद्ध सुरू झाले असून यात जनतेचे मात्र हाल होत आहेत.

कोण कोणासोबत आणि कोण कोणाच्या विरोधात? याठिकाणी दररोज वेगवेगळे चित्र तयार होता दिसत आहे.विकास कामाचा कुठलाच अजेंडा दिसत नाही.सर्वच विषय समितीच्या नेमणूक रखडल्या आहेत.विकासकामांसाठी मिळणारा कोट्यवधींच्या निधीवर डोळे ठेवून नेते मंडळी टपले आहेत.निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव,निकृष्ट दर्जाची कामे,रखडलेले प्रकल्प आणि कामांची अपूर्ण अंमलबजावणी यामुळे नगरपरिषदेच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# देवेंद्र फडणवीसांना महाराष्ट्रात दंगली घडवायच्यात, 'ध' चा 'मा' करून माझ्या वक्तव्याची मोडतोड केली; पुण्यातील भाजपच्या राड्यानंतर हर्षवर्धन सपकाळ संतापले

**पुणे । प्रतिनिधी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ (कीींहींरीवहरप डरज्ञिरश्र) यांनी छत्रपती शिवाजी महाराज (उहहरींरिींळ डहळींरक्षळ चरहरीरक्ष) आणि टिपू सुलतानची (ढळीिं डीश्रींरप) तुलना केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या वक्तव्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपकाळ यांच्यावर जोरदार शब्दांत टीका केली. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना करून मुघलांच्या जोखडातून सामान्य माणसाला मुक्त केले. खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य उभे करणारे शिवरायच होते. दुसरीकडे हजारो-लाखो हिंदूंची हत्या करणाऱ्या टिपू सुलतान यांची तुलना शिवरायांशी करून दोघांनाही समान सन्मान देण्याची मागणी करणे म्हणजे याहून मोठे लांगुलचालन आणि जोडे चाटण्याचे उदाहरण असू शकत नाही. आम्ही हे सहन करणार नाही, असे फडणवीसांनी म्हटले. या पार्श्वभूमीवर आज पुण्यात सपकाळ यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ



भाजपकडून आंदोलन सुरू असतानाच भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला. या घटनेनंतर हर्षवर्धन सपकाळ चांगलेच संतापल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ एक्सवर पोस्ट करत म्हणाले की, माझ्या वक्तव्याची मोडतोड करून ध चा मा करून देवेंद्र फडणवीसांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत, असे मी सांगितले होते. त्याचा प्रत्यय आज पुण्यात आला. पुण्यातील भाजपचे गुंड पुणे काँग्रेसच्या कार्यालयावर चाल करून आले व त्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत दगडफेक करत काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांसह पत्रकार भगिनींवर प्राणघातक हल्ला केला. भाजपच्या या गुंडगिरीचा आम्ही तीव्र निषेध करतो. पुणे पोलिसांनी दंगेखोर भाजप गुंडाना चिथावणी देणाऱ्या धीरज घाटे आणि महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह भाजपच्या दंगेखोरांवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. माझ्या वक्तव्याची मोडतोड करून ध चा मा करून देवेंद्र फडणविसांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत असे मी सांगितले होते, त्याचा प्रत्यय पुण्यात आला. दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याविरोधात पुण्यामध्ये भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. भाजप कार्यकर्त्यांकडून पुण्यात काँग्रेस भवनासमोर निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला प्रत्युत्तर देण्यासाठी काँग्रेसचे कार्यकर्ते देखील उपस्थित होते. यावेळी जोरदार घोषणाबाजी सुरू असतानाच दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वादाचे रूपांतर थेट दगडफेकीत झाले. आंदोलकांकडून झालेल्या दगडफेकीत काही कारच्या काचा फुटल्या असून एका काँग्रेस कार्यकर्त्याच्या डोक्याला दगड लागल्याने तो गंभीर जखमी झाला. यावेळी पोलिसांना देखील दगड लागल्याची माहिती आहे. तर काँग्रेसकडून भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटेंना अटक करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. काँग्रेस नेते प्रशांत जगताप यांनी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या उपस्थितीत आमच्या कार्यालयावर हल्ला करण्यात आला. काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांची डोकी फोडण्यात आली. महापौर फक्त तमाशा बघत होत्या, पोलिसांनाही बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप केला.

# आरटीई शुल्क प्रतिपूर्ती दर जाहीर; प्रतिविद्यार्थी १७,६७० रुपये कायम

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत इंग्राजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम शासनातर्फे शाळांना देण्यात येते. त्यानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा शुल्क प्रतिपूर्तीचा दर शिक्षण विभागाने निश्चित केला आहे. यंदा शाळांना प्रतिविद्यार्थी १७ हजार ६७० रुपये देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.




मागील वर्षी देखील हा दर देण्यात आला होता. यंदा त्यामध्ये वाढ होईल, अशी अपेक्षा संस्थाचालकांना होती. मात्र, सरकारकडून आरटीई विद्यार्थ्यांच्या प्रतिपूर्तीची रक्कम 'जैसे थे' ठेवण्यात आली आहे. याबाबतचा नुकताच शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. चालू शैक्षणिक वर्षातील आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. परंतु, या विद्यार्थ्यांच्या प्रवेशानंतर शाळांना शासनाकडून किती रक्कम मिळणार, हे स्पष्ट झाले नव्हते. अखेर राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे शाळांना शुल्क प्रतिपूर्तीच्या स्वरूपात प्रतिविद्यार्थी १७ हजार ६७० रुपये मिळणार, हे निश्चित झाले आहे. २०२५-२६ शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती अदा करताना २१ ऑगस्ट २०१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार पडताळणी करावी लागणार आहे.

शाळेने शिक्षण हक्क अधिनियम अंतर्गत आरटीईची मान्यता प्राप्त असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन लॉटरी पद्धतीने यापूर्वी ज्या शाळेत प्रवेश मिळालेला आहे, असे विद्यार्थी संबंधित शाळेत शिकत असल्याची खात्री सरल व आरटीई पोर्टलवरून करावी. सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड सरल पोर्टलवर नोंदवलेले असावे. केवळ आधार नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरावी. तसेच, प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या संख्येपैकी फक्त २५ टक्के संख्या ही प्रतिपूर्तीसाठी ग्राह्य धरण्यात यावी, असे देखील स्पष्ट केले आहे.

# पीएमपीएमएलच्या बसेससाठी स्वतंत्र पार्किंग; महानगर परिवहन प्राधिकरण समितीत निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

विश्रांतवाडी, मुंढवा चौक, मार्केट यार्ड ते सेव्हन लव्हज चौक, गोळीबार मैदान, घोरपडी ब्रिज, मगरपट्टा परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, प्रस्तावित कॉरिडॉर, डबल डेकर टनेल तसेच पीएमपीएलच्या नवीन बसेससाठी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या ठिकाणी वाढत्या वाहतूक कोंडीचा विचार करून तातडीने प्राधान्यक्रम ठरवून प्रकल्प राबवावेत, अशा स्पष्ट सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण समितीची आढावा बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात झाली. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक समस्यांवर समन्वयाने उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. विविध यंत्रणांमध्ये समन्वय वाढवून वाहतूक नियोजन सुसूत्र करण्याची गरज असल्याचे मत



बैठकीत व्यक्त करण्यात आले. डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, ज्या भागांमध्ये नियमितपणे वाहतूक कोंडी निर्माण होते, त्या ठिकाणांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करावा. वाहतुकीचा प्रवाह, वाहनांची संख्या, पीक अवरमधील ताण, सिग्नल व्यवस्थापन, रस्त्यांची रुंदी आणि पर्यायी मार्गांची उपलब्धता यांचा सखोल आढावा घेऊनच प्रकल्पांचे सादरीकरण करावे. सर्वेक्षणाधारित नियोजन केल्यास निधीचा कार्यक्षम वापर होईल आणि दीर्घकालीन परिणाम साधता येतील, असे त्यांनी नमूद केले.


बैठकीत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला चालना देण्यासाठी बस कॉरिडॉर, मल्टी-लेव्हल पार्किंग, बस टर्मिनस सुविधा आणि पार्क-अँड-राईड संकल्पना राबविण्याबाबतही चर्चा झाली. पीएमपीएलच्या ताफ्यात नव्याने समाविष्ट होणाऱ्या बसेससाठी स्वतंत्र व पुरेशी पार्किंग जागा उपलब्ध करणे अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले. तसेच, प्रस्तावित डबल डेकर टनेल प्रकल्पाबाबत प्राथमिक आराखड्याचा आढावा घेण्यात आला. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपूल, अंडरपास, सिग्नल समन्वय प्रणाली आणि स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.बैठकीला पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, महापालिकेचे अपर आयुक्त पृथ्वीराज बी. पी. उपस्थित होते. तसेच, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त योगेश म्हसे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# महापालिकेचे 'वॉर्ड' बदलणार! २३ गावांच्या समावेशानंतर क्षेत्रीय कार्यालयांचा नवा नकाशा ठरणार

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावानंतर पहिल्यांदाच महापालिका निवडणूक झाली आहे. त्यामुळे, या गावांसह प्रभाग रचना करण्यात आली होती. परिणामी आता महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दी पुन्हा बदलणार आहेत. त्यासाठीची प्रक्रिया महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने सुरू केली असून, त्यात, राजकीय हस्तक्षेपही होण्याची शक्यता आहे.

महापालिका निवडणुका ४१ प्रभागांमध्ये झाल्या असून, लोकसंख्येच्या निकषावर ही प्रभाग रचना करण्यात आली आहे. त्यामुळे, नव्याने समाविष्ट झालेल्या गावांचे प्रभाग आकारने मोठे असल्याने त्यांचे क्षेत्रीय कार्यालयनिहाय विभाजन जिकरीचा विषय ठरणार आहे. महापालिकेची सध्या १५ क्षेत्रीय कार्यालये आहेत. मात्र, आता हद्दवाढ झाल्याने त्यात वाढ होण्याचीही शक्यता व्यक्त केली जात



आहे. मात्र, पालिका प्रशासन काय निर्णय घेणार पुढील काही दिवसांत ठरणार आहे. महापालिकेची क्षेत्रीय कार्यालयेही मिनी महापालिका म्हणून ओळखली जातात. नागरिकांशी संबधित स्थानिक कामे तसेच प्रशासकीय कामात सुसूत्रता यावी या उद्देशाने महापालिका आयुक्तांचे अनेक अधिका क्षेत्रीय कार्यालयांची जबाबदारी असलेल्या महापालिका सहायक आयुक्त ( क्षेत्रीय अधिकारी) यांना दिले जातात. प्रभागांची संलग्नता आणि क्षेत्रफळ लक्षात घेऊन त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयाची हद्द निश्चित केली जातात. या क्षेत्रीय कार्यालयाकडे अतिक्रमणे काढणे, दैनंदिन स्वच्छता, प्रभागातील तातडीची छोटी कामे, महापालिकेच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी आपल्या हद्दीत महापालिकेच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचविणे अशी वेगवेगळी कामे करावी लागतात तर क्षेत्रीय अधिकाऱ्यांना १० लाखांपर्यंतचे खर्चाचे अधिकार असतात.तर क्षेत्रीय कार्यालयांच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी परिमंडळे असून त्याची जबाबदारी उपायुक्तांवर असते. महापालिकेत पाच परिमंडळे आहेत. २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीनंतर क्षेत्रीय कार्यालयांची प्रभाग निहाय हद्द निश्चित करण्यात आली होती. मात्र, आता त्यात पुन्हा बदल केले जाणार आहेत.आपला प्रभाग ठराविक क्षेत्रीय कार्यालयातच यावा यासाठी नगरसेवकांकडून महापालिकेत लॉबिंग सुरू करण्यात आली आहे. अनेकदा प्रभागांची रचना करताना मोडतोड झाल्याने एखादा भाग लांब असतो. अशा वेळी प्रशासनाकडून त्या भागाचा विचार करून तो लांबच्या अंतरावर असलेल्या क्षेत्रीय कार्यालयाशी जोडला जातो. त्यामुळे, नागरिकांच्या सोयीसाठी नगरसेवकांकडून आपल्या जवळच्या क्षेत्रीय कार्यालयातच आपला प्रभाग असावा यासाठी प्रयत्न सुरू केले जात आहेत.

विशेषत: वाघोली, खडकवासला परिसरातील गावे, कात्रज परिसरातील नवीन गावे, बाणेर-बालेवाडी आणि सूस-बावधन, मांजरी, केशवनगरचा भाग अशा भागासह मध्यवर्ती पेठांमधील काही प्रभागांची हद्द निश्चित करताना अडचणी निर्माण होणार आहेत.

# महाशिवरात्रीनिमित्त जेजुरी गडावर त्रैलोक्य शिवलिंग दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी

**जेजुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिरात महशिवरात्र उत्सवा निमित्त त्रैलोक्य शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.पहाटे तीन पासून शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या वर्षाकाठी दहा यात्रा भरतात. यातील महाशिवरात्र उत्सवाला धार्मिक महत्व आहे. कैलास पर्वता नंतर जेजुरी गडावर भगवान शंकर व पार्वती यांचे शिवलिंग आहे. म्हणून जेजुरीला दक्षिण काशी मानले जाते. जेजुरी गडाच्या मुख्य शिखरावर स्वर्ग लोकी शिवलिंग, मुख्य मंदिरात स्वयंभू भूलोकी शिवलिंग व मंदिरात तळघरात पाताळ लोकी शिवलिंग आहे. शिखर आणि तळघरात असणारे शिवलिंग फक्त महाशिवरात्री दिवशी भाविकांना दर्शनासाठी खुले केले जाते. महाशिवरात्री दिवशी तिन्हीही शिवलिंगाचे दर्शन घेण्याची पर्वणी भाविकांना उपलब्ध होते. आज




मध्यरात्री १२ वाजता शिखरावरील व तळघरांतील शिवलिंग खुली करण्यात आली. मानकरी वर्गाच्या पूजा झाल्यानंतर पहाटे तीन वाजता त्रैलोक्य शिवलिंग दर्शन सुरू करण्यात आले. पहाटे पासूनच हजारो भाविकांनी रांगा लावून दर्शन सुरू केले. या दर्शनासाठी चार ते पाच तास लागत होती.

श्री मार्तंड देवसंस्थान च्या वतीने महाशिवरात्र उत्सवानिमित्त जेजुरी गडावर व मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई तसेच फुलांची सजावट करण्यात आली होती. रांगेत पाणी, महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. दर्शन रांगेची चोख व्यवस्था करण्यात आली होती.व्हीआयपी दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद ठेवल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले. तसेच महाशिवरात्र उत्सवानिमित्त स्वर्ग लोकी पातळ लोकी व भुलोकी शिवलिंगाचे दर्शन झाल्याने भाविक आनंद व्यक्त करत होते. श्री मार्तंड देवसंस्थान चे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे,तसेच विश्वस्त,व्यवस्थापक , आधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्या वतीने दर्शन व्यवस्थेचे चांगले नियोजन करण्यात आले होते. गर्दी नियंत्रित करण्यासाठी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# टाकळी हाजी ग्रामपंचायतीची जमीन ४० वर्षांनंतर परत; बेकायदेशीर नोंद रद्द

**टाकळी हाजी । प्रतिनिधी**

टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जुन्या कोंडवाड्याच्या जमिनीवर ग्रामीण विकास संस्थेने बेकायदेशीररीत्या नोंद करून कब्जा करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. प्रशासनाने तब्बल ४० वर्षांनंतर ही बेकायदेशीर नोंद रद्द करत आदेशान्वये ग्रामपंचायतीचा हक्क पुन्हा बहाल केला आहे.

मौजे टाकळी हाजी येथील ही जमीन सन १९५२-५३ ते १९८५-८६ या कालावधीत सलगपणे ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याचे शासकीय अभिलेखात स्पष्ट नमूद आहे. मात्र, सन १९८५ मध्ये तत्कालीन चौकशी अधिकाऱ्याने अधिकाराबाहेर जाऊन संस्थेचे, तसेच संबंधित व्यक्तीचे नाव मालमत्ता पत्रिकेवर नोंदविले होते. विशेष म्हणजे, या जमिनीसंदर्भात कोणताही विक्री करार, भाडेपट्टा, शासनाची परवानगी अथवा ग्रामपंचायतीचा ठराव अस्तित्वात नसतानाही जमीन संस्थेच्या नावावर दाखविण्यात आली होती. चौकशी नोंदवहीत आधी धारक ड्ढ ग्रामपंचायत असे स्पष्ट नमूद असताना, त्यावर फेरफार करून नवीन नोंद करण्यात आल्याचे आढळून आले. या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यानंतर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी हा प्रकार जाणीवपूर्वक केलेला फेरफार असल्याचे नमूद केले आहे. संबंधित संस्थेकडून अथवा व्यक्तीकडून मालकी हक्क सिद्ध करणारे कोणतेही अधिकृत दस्तऐवज सादर करण्यात आले नसल्याचेही स्पष्ट झाले.

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या आदेशानुसार, संस्थेचे नाव तत्काळ रद्द करण्यात आले आहे. मालमत्ता पत्रिकेवर धारक ग्रामपंचायत टाकळी हाजी अशी नोंद करण्यात आली आहे. सन १९८५ मधील निर्णय बेकायदेशीर व अधिकारबाह्य ठरविण्यात आला आहे. या प्रकरणामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. ग्रामपंचायतीची जमीन कोणाच्या आधारे संस्थेच्या नावावर करण्यात आली? त्या काळातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? अशा प्रकारे किती ग्रामपंचायत जमिनी इतर कुणाकडून हस्तगत करण्यात आल्या, याची चौकशी होणार का, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

# मुस्लिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वपक्षीय इच्छाशक्ती अत्यावश्यक : हाजी झुबेर मेमन

**पुणे । प्रतिनिधी**

''मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, आरोग्य आणि बेरोजगारी या मूलभूत प्रश्नांवर सर्व राजकीय पक्षांनी एकत्रितपणे ठोस भूमिका घेतली पाहिजे. समाजाच्या प्रगतीसाठी सर्वपक्षीय इच्छाशक्तीच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवू शकते,'' असे मत 'महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स'चे संस्थापक अध्यक्ष हाजी झुबेर मेमन यांनी केले.

महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स' तर्फे मुस्लिम समाजातील राज्यातील सर्वपक्षीय नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभ रविवारी (ता. १५) आयोजित करण्यात आला होता. त्यात मेमन बोलत होते. पुणे शहराध्यक्ष फरीद खान, कलाकार आसिफ अलबेला, कारी मुद्दसिर, सुलतान शहा, तारीख जमील, ईलहाजोद्दीन फारुकी, कामील शेख, इक्बाल अन्सारी, मजहर शेख आणि अक्रम मदारी यासह राज्यातील विविध पक्ष संघटनांचे नवनिर्वाचित नगरसेवक व कॉन्फरन्सचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, संभाजीनगर, संगमनेर, अहिल्यानगर, मुंबई, सातारा आणि कोल्हापूर येथून आलेल्या नगरसेवकांना यावेळी गौरविण्यात आले.



हाजी मेमन म्हणाले, ''आज विविध समाज घटक आपल्या प्रश्नांसाठी संघटित होत आहेत. मुस्लिम समाजानेही पक्षभेद बाजूला ठेवून विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येणे गरजेचे आहे. युवक आणि महिलांनी राजकारण व समाजकारणात सक्रिय सहभाग घेतल्यास समाजाच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल.''मुस्लिम समाजात मराठी भाषेचे ज्ञान वाढावे या उद्देशाने 'चला मराठी शिकूया' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांना पुस्तकाच्या प्रती भेट देण्यात आल्या. भाषिक सक्षमता ही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

# पुणे जिल्ह्यात चार तालुक्यांत

## पीएमआरडीएकडून १० नवे रस्ते उभारणार

**पिंपरी । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील चार तालुक्यांत नव्याने दहा रस्ते उभारण्यात येणार आहे. त्यापैकी पिंपरी- चिंचवड शहरालगत असलेल्या हवेली, मावळ, शिरूर आणि खेड तालुक्यात सर्वाधिक रस्ते तयार केले जाणार आहेत. पीएमआरडीएच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या या रस्त्यामुळे नागरीवस्तीमधील दळणवळण वाढीला मदत होणार असून, तालुक्यातील शेतकरी, कामगारांना याचा फायदा होणार असून, पर्यटन वाढीसाठी हा महत्त्वाचा टप्पा असणार आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत नऊ तालुक्यांचे कामकाज चालते. या तालुक्यातील पायाभूत सुविधा उभारण्याचे काम प्राधिकरणातर्फे करण्यात येते. यापूर्वी विविध तालुक्यात रस्ते उभारण्यात आले होते. आता पुन्हा नव्याने दहा रस्त्यांचे नियोजन असून, त्या अनुषंगाने निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. येत्या आठवडाभरात या निविदांवर कार्यवाही सुरु होणार आहे. कार्यआदेश निघाल्यानंतर प्रत्यक्षात काढण्यात येणार आहे.

पीएमआरडीएच्या अंतर्गत हवेली, खेड, शिरुर, मावळ आणि पीएमआर अंतर्गत ही कामे करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित ठेकेदाराला साधारण दहा वर्षे देखभाल दुरुस्तीचा जबाबदारी राहणार आहे. या चार तालुक्यातील अंतर्गत तसेच, महत्त्वाची रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली आहे. नागरीवस्ती, शेतकरी यांना आवश्यक असलेल्या आणखी काही रस्त्याची मागणी देखील स्थानिक पातळीवर करण्यात आली होती. त्यानुसार स्थानिक आमदार यांच्या मागणीनुसार या रस्त्याची कामे होणार आहेत.

# पुण्यात ४४ वे भव्य पुष्पप्रदर्शन सुरू; २६६ विभागांत आकर्षक फुलांची मेजवानी

**पुणे । प्रतिनिधी**

डेलिया , आर्किड, न्थुरिअम, जर्बेरा, गुलाब, कार्नेशन यांसह विविधरंगी आकर्षक फुले आणि त्यांची लक्षवेधी मांडणी...पुष्पसजावट पाहून हरखून गेलेले आबालवृद्ध... टवटवीत व सुंदर फुलांबरोबर सेल्फी घेत असलेली तरुणाई... असे चित्र महापालिकेने आयोजित केलेल्या पुष्पप्रदर्शनात दिसत आहे.

महापालिकेचा उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरण विभागाच्या वतीने महापालिकेच्या ४४ वे फळे, फुले व भाजीपाल्याचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. महापालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेते गणेश बिडकर, महापालिका आयुक्त नवलकिशोर



राम यांच्या हस्ते शनिवारी (दि. १४) जंगली महाराज रस्ता येथील छत्रपती संभाजीराजे उद्यानात या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे गटनेते सोपान (काका) चव्हाण, नगरसेविका स्नेहा माळवदे, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, सह-आयुक्त डॉ. अशोक घोरपडे, उद्यान अधीक्षक संतोषकुमार कांबळे, स्नेहल हरपळे, कार्यकारी अभियंता राहुल साळुंके आदी उपस्थित होते. या वेळी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांना रांगोळीद्वारे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बोन्साय , फीचर्स गार्डन , पुष्करणीच्या विविध पुष्परचना, तसेच उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी तयार केलेले विविध देखावे, तसेच फुलांच्या कलाकृती नागरिकांना पाहावयास मिळेल. तसेच फ्लेमिंगो बाग, टाकाऊ टायरपासून कलाकृती, बिबट्याचा मानवी वस्तीत अधिवास देखावा, लाकडाच्या वस्तूपासून कलाकृती, नक्षत्र उद्यान, झेन गार्डन, फुलांची बग्गी, प्लास्टिक बॉटल्सपासून कलाकृती, परसबाग व फळांचे घर, फुलांपासून फुलपाखरू कलाकृती, वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्ताने भारतमाता कलाकृती, वॉटरफॉल फिचर गार्डन अशा विविध प्रतिकृती तयार करण्यात आलेल्या आहेत.

# पिंपरी चिंचवड शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**पिंपरी । प्रतिनिधी**

आगामी काळात साजरे होणारे सण, उत्सव, क्रांतिवीर लहुजी साळवे पुण्यतिथी व वासुदेव बळवंत फडके पुण्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. हे आदेश १७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील.

या आदेशान्वये कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बाळगणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे, शस्त्रे, सोटे, भाले, चाकु, सुरा, कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाचे चित्राचे, प्रतिकात्मक प्रेताचे, पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठमोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालण्यात आली आहे.महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) प्रमाणे पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणूक काढण्यास बंदी मनाई राहील. वरील आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही